श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक

वर्ष १८ ] शके १८६३ आषाढ, श्रावण, भाद्रपद. [ अंक ४-५-६

बाबा बाबा, निशिदिनीं मना बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं कितीतरी असे दिव्य जादू अवीट ॥



[illegible] ॥
[illegible] ॥

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका भवति भवार्णवतरणे नौका ॥ १ ॥

—शंकराचार्य

संपादकः—रामचंद्र वासुदेव घैसास

# अनुक्रमणिका


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| संपादकीय | ... | ... | .... | ... | ... | |
| श्रीसाईगाथामृत | ... | ... | ... | ... | .... | १५– ४३ |
| स्फुट | ... | ... | ... | ... | ... | ३८४–३९० |
| शिर्डीवृत्त | ... | ... | ... | ... | ... | ३९१–३९४ |
| अनुभव | .... | .... | .... | .... | ... | १५– १८ |


## श्रीसाईभक्तांस विनंती

साईलीलेचें वर्ष चैत्र महिन्यापासून सुरू होते. तरी अंक सुरू करणें झाल्यास चैत्रापासून वर्गणीदार झाले पाहिजे

भक्तांनीं आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खालील पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें टोपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळे त्यांना पोस्टांतून पाठविलेल्या उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनीं आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चरई रोड, ठाणें यांस कळवावें.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं चालू सालची म्हणजे शके १८६३ ची वर्गणी २ रु. ४ आणे अद्याप पाठविली नाही, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठवून द्यावी. अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे २ रु. ७ आ. ची व्ही. पी. करणेंत येईल.


रा. वा. घैसास, सम्पादक.

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २

गोखले रोड नॉर्थ; दादर, मुंबई ०..



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

शके १८६३ )     श्रीसद्गुरु साईनाथ     वर्ष १८ अंक ४-५-६
आषाढ--श्रावण-भाद्रपद

श्री साई लीलेच्या सुरवाती पासूनच्या वर्षवार संपूर्ण अंकाच्या करितां मध्यंतरी पुष्कळ नवीन भक्तांकडून मागणी होती व असे वर्षवार अंक पुस्तकरूपाने बांधून देणेची व्यवस्था करणेत आली. एक दोनच असे संपूर्ण सेटस् आतां शिल्लक आहेत.

वर्ष १ ते ६ या सुरवातीच्या अंकांतच महाराजांचे विद्यमान-काळीं भक्तांस आलेले अनुभव मुख्यत: आलेले आहेत व ते फारच उद्बोधक आहेत, परंतु याच वर्षाचे अंक हल्ली शिल्लक नाहींत. या वर्षाचे अंकाच्या अनुभव सदराचे सुटे छापील फॉर्म उपलब्ध होते. त्यावरून सुमारें ६७५ अशा पानांची पुस्तकें तयार करून घेतली आहेत. गरजूंनी मागविल्यास किं. रु. १ व शिवाय पोष्ट खर्च घेऊन पाठविण्यांत येतील. प्रती अवघ्या ३४ च आहेत.

## —याचना—

शके १८६३ चा चैत्र वैशाख व ज्येष्ठ महिन्याचा जोड अंक वाचकांस सादर करून त्यांच्या ऋणांतून मुक्त झाल्याचें समाधान आम्हांस वाटत आहे.

श्रीसाईलीलेमार्फत, श्रीसाईनाथ महाराजांची व आमच्या वाचक-वृंदाची होईल ती अल्प सेवा आम्ही मनापासून निरपेक्ष बुद्धीनें करीत आहोंत. परंतु साई भक्तांकडून आम्हाला जें प्रोत्साहन मिळावयास पाहिजे त्याचा मात्र अभाव आहे ही गोष्ट मोठ्या खेदानें नमूद करावी लागत आहे. ४ वर्षें झाली तरी अद्याप वर्गणीदारांची संख्या समाधानकारक नाहीं. प्रतिवर्षी कांहीं जुने वर्गणीदार गळतात व कांहीं नवीन येतात, परंतु बेरीज घेतल्यास वस्तुस्थिती आहे तीच राहाते. वर्गणीदारांची संख्या हेंच श्री साईलीलेचें जीवन आहे, व योग्य परिपाक न झाल्यास तिनें जीवित कोणाच्या आधारावर कंठावयाचें ? हल्लींच्या वर्गणीदारांनीं जर एकेक नवा वर्गणीदार मिळवून दिला तर श्रीसाईलीलेच्या पोटापाण्याचा प्रश्न सहज सुटेल. आपणा सर्वांना जिव्हाळ्याचे नातेवाईक, स्नेही वगैरे मंडळी आहेत. त्यांना जर एक हा लहानसा " श्रीसाई लीलेचे वर्गणीदार व्हा " असा सवाल टाकलात तर ते स्वार्थानें नाहीं म्हणणार नाहीत. आपलें येवढें वजन त्यांच्यावर खास आहे. शिवाय हल्लीं साईलीलेची वर्गणी पहिल्यापेक्षा कमी म्हणजे २-४-० झाली आहे तेव्हां आपल्या शब्दास खात्रीनें मान मिळेल.

अखिल हिंदुस्थानांत पुष्कळ माणसें अर्धपोटीं राहिल्यामुळें लवकर काळवश होतात. त्याच कोटींत आपण श्री साईलीलेसारख्या पवित्र वस्तूचा स्वाहः होऊन देणार कीं काय ? हा प्रश्न आमचा एकट्याचा नव्हे परंतु सर्व श्री साईभक्तांचा आहे. एक शब्द खर्च केलात तर कार्य होईल. मग तेवढा आपण श्रीसाईनाथ महाराजांची स्मृति जागृत ठेवण्याकरितां करणार नाहीं काय.

ही याचना आम्ही दरवर्षी करीत आलों आहोंत व त्याप्रमाणें चालू वर्षा-करितां पुन्हा करीत आहोंत. याचा उपयोग कितपत होईल याचा अंदाज मागील अनुभवावरून पाहिला तर आशेला फारशी जागा आहे असें वाटत नाहीं. तरी पण इतक्यांत अगदींच निराश न होतां आहे या स्थितींत आणखी एक वर्षभर आम्ही श्रीसाईलीलेचें काम नेटानें चालविण्याचें ठरविलें आहे.

—संपादक



# श्रीसांईगाथामृत.

## प्रकरण ३ रें

### हेमाडपंतावर अनुग्रह. दोन दिडक्या दक्षिणा.

काय देवाची अतर्क्य लीला । कोण जाणेल याची कळा ।।
अंत नाहीं यांच्या खेळा । खेळून खेळा निराळा ।। १२६ ।।

**श्रीसाईसच्चरित्र. १८-१२६.**

आतां या प्रकरणांत श्री. बाबांनी हेमाडपंतावर कसा अनुग्रह केला, त्यांचेपासून काय दक्षिणा घेतली इत्यादि कथा सांगण्याचे योजिले आहे. प्रथम दक्षिणेविषयीं विचार करूं.

### दोन प्रकारची दक्षिणा

जेव्हां आपण, राजा, देव अथवा गुरु यांच्या भेटीस अगर दर्शनास जातो तेव्हां रिक्तहस्तें जाऊं नये अशी धर्माज्ञा आहे. याकरितां अशा दर्शनाचे वेळीं आपण बरोबर फळफळावळ, पेढे, खडीसाखर यासारखे पदार्थ आणि कांहीं द्रव्य घेऊन जातो आणि ते सर्व पदार्थ त्यांचेपुढें ठेवितों. या पदार्थांला विशेषतः द्रव्याला दक्षिणा असें म्हणतात. ही प्रथम प्रकारची म्हणजे व्यावहारिक दक्षिणा होय. पण जेव्हां सद्गुरु शिष्याला दीक्षा देतो म्हणजे त्याच्या कानांत मंत्र सांगतो तेव्हां शिष्याला सद्गुरुची पूजा करून कांहीं दक्षिणा (द्रव्य) द्यावी लागते, ही दुसऱ्या प्रकारची म्हणजे अव्यवहारिक अध्यात्मिक दक्षिणा होय.

### बाबांची तऱ्हा

बाबा हे प्रथम जेव्हां शिरडीस आले तेव्हां बरेच दिवस ते कोणापाशीं दक्षिणा मागत नसत किंवा कोणी त्यांना ती देत नसत. ते एका पडित (पण पुढें जिर्णोद्धार

केलेल्या ) मशिदींत रहात असत, एका फाटक्या तरटावर बसत, एक फडके, एक लंगोटी, एक कफनी, एक टापर व एक टमरेल हीच त्यांनी जिंदगी होती आणि गांवांत चार पांच घरें 'भवति भिक्षां देहि' मागून ते आपला उदर निर्वाह करीत. चिल्मीस तंबाखु, धुनीस लाकडें व दिव्यास तेल इतकेंच काय ते गांवांतून मागून आणत. द्रव्याची त्यांना गरज किंवा अपेक्षा नव्हती. बाबा ही काय अमोलिक चीज आहे याची जाणीव बरेच वर्षे लोकांना नव्हती. हा एक वेडा फकीर आहे असे लोक समजत असत. पण पुढें श्री. नानासाहेब चांदोरकर हे बाबांच्या दर्शनास आल्यापासून आणि त्यांनी बाबांची प्रसिद्धी केल्यापासून भक्तांची गर्दी एकसारखी वाढू लागली. चोहोंकडून सर्व प्रकारचे व सर्व जातींचे भक्त मशिदींत बाबांच्या दर्शनास येऊं लागले आणि अनेक तऱ्हेच्या भेटी व दक्षिणा देऊं लागले आणि बाबाहि दक्षिणा मागुं लागले. पण त्यांचे याविषयींचें आचरण मोठें विलक्षण व अतर्क्य असे. बाबांचे ( म्ह. देवाचें ) बाळदेवच ( श्री. बा. वि. देव ) यांनीं श्रीसाईलीला वर्ष ७ अंक १-२ यांत याविषयी सुंदर माहितीनें भरलेला लेख लिहिला आहे त्यांत ते म्हणतातः—बाबा सर्वांजवळ सार्वजनीक दक्षिणा मागत नसत. न मागता दिली तर कधीं कधीं ते ती घेत व कधीं कधीं घेत नसत. कांहीं विवक्षित भक्ताकडेच मागत. बाबांनी मागावी व आपण ती द्यावी अशी इच्छा करणाऱ्या पुष्कळ लोकांजवळ ते मागतच नसत. त्यांच्या इच्छेविरुद्ध दिल्यास तिला ते हातहि लावीत नसत. इतके करूनहि त्यानें ती ठेविली तर ही परत घेऊन जा असे त्यास सांगत. सर्वांजवळ सारखीच दक्षिणा मागत नसत. ज्याच्या त्याच्या अनुकूलतेप्रमाणें व इच्छेप्रमाणें व चरणी असलेल्या भावनेप्रमाणें कमीजास्त मागत. स्त्रियांजवळ व मुलांजवळहि मागत. सर्वच श्रीमंतांकडे मागत असे नाहीं व सर्वच गरीबाजवळ मागत नसत असेंहि नाही.

×× कित्येकवेळा आपण दिलेल्या दक्षिणेंतून ते आपणास कांहीं पैसे परत देत, व हे माझे पैसे मी तुला देतों तें तूं नीट जतन करून ठेव किंवा देवाऱ्यांत ठेवून त्याची पूजा करीत जा असें सांगत व त्यापासून त्यास कल्पनातीत फायदा होई. मनःसंकल्पापेक्षां जास्त दक्षिणा दिली तर जास्त दिलेली दक्षिणा त्यास ते परत देत. कित्येक वेळां आपल्या इच्छेप्रमाणें दक्षिणा दिली असतां तूं आणखी इतकी जास्त दे असें म्हणून त्याच्याकडुन तितकी जास्तहि घेत. × ×

या प्रमाणें साधारणपणें रोज ४००।५०० रुपये रक्कम जमत असे व ती बाबा

आपल्या तिजोरीत-फकनीच्या खिशांत ठेवीत. स्वतःकरितां त्यांतील कांहीं ते उपयोग करीत नसत. तर कोणाकोणास १०, ३०, ५०, १०० वगैरे रुपये वांटून किंवा आंबे, ऊस, खरबुजे, केळी वगैरे खरेदी करून लोकांना वाटीत किंवा गवई, कथेकरी, पुराणिक भिक्षुक, तमासगीर इत्यादि लोकांना त्यांच्या त्यांच्या लायकी प्रमाणें बिदागी देत आणि सायंकाळच्या आंत जमलेली सर्व रक्कम खलास करून टाकीत.

शेवटी बाबांचे ( देवाचे ) याळ श्री देव असें म्हणतात कीं, मुमुक्ष किंवा भक्त दक्षिणा श्रद्धायुक्त अंतःकरणानें किंवा दुःखित अंतःकरणानें देतो याची बाबा कसून परिक्षा करीत आणि त्याची वित्तावरची आसक्ति सर्वस्वी नाहीं पण अंशतःतरी सुटली आहे की नाहीं किंवा सोडण्याची थोडीबहूत तरी त्याची तयारी आहे किंवा नाही ही कसोटी दक्षिणेच्या रूपानें पहात असत.

वर सांगितल्या प्रमाणें दक्षिणा घेण्यांत बाबाची योजना ( हेतु, विनियोग ) अतर्क्य असे व यांतील रहस्य तेच जाणांत. पण माझ्या अल्पमतीला बाबा यांत एक उदात्त तत्वाची शिकवण देत असत असे वाटते. ते तत्व म्हणजे—

## ' नदित्तमुपतिष्टते '

दिल्यावांचून मिळत नाहीं हे होय. या तत्वाचा अंमल व्यवहारांत किंवा परमार्थाला दिसून येतो. हें खाली दिलेल्या उदाहरणावरून दिसून येईल. (१) श्री. गणपतराव बोडस नाट्यकला विशारद यांचे चरित्र, नुकतेच प्रसिद्ध झालेले एका मित्रानें मला दाखविलें. व त्यांतील एक गोष्ट वाचून दाखविली. श्री. बोडस हे श्रीबाबांच्या दर्शनास एकदां गेले होते. बाबांनी त्यांचेपाशी कांहीं दक्षिणा मागितली. त्यांनी ती आपल्या पाकीटांतून काढून दिली. पुनः दोनतीनदां मागितली तीहि त्यांनी दिली व शेवटी आपले सर्व पाकीट रिकामें केलें. याबद्दल श्री. बोडसांना कांहीं विशाद वाटला नाहीं. पण त्याचा परिणाम असा झाला की, पुढें आयुष्यांत पैशाची अडचण किंवा ददात आपणास पडली नाही, असें बोडस लिहीतात. (२) सम्राट कवि श्री. रवींद्रनाथ टागोर हे गीतांजलीत [ पान ५० ] एका भिकाऱ्यानें दिलेल्या दक्षिणेची कथा गातात ती अशीः—मी एक भिकारी गांवांत गल्लोगल्ली भिक्षा मागत फिरत होतो. इतक्यांत एक चमत्कार माझ्या दृष्टीस पडला. एका अत्यंत शोभायमान व दैदिप्य रथांतुन आपण मिरवत आला. हे महाराज कोण असा मी विचार करूं लागलो

त्याला म्हणाले हुं, आतां उठ शाम्या ( माधवराव देशपांडे ) कडे जाऊन त्यांचेकडून पंधरा रुपये दक्षिणा घेऊन ये. त्यांचेकडे जाऊन क्षणभर गोष्टी करून दक्षिणेसहित परत ये. बाबांच्या मनांत हेमाडपंताविषयी कृपा उपजली आणि दक्षिणेच्या निमित्तानें श्यामाकडे जाण्यास त्यांनी फर्माविलें. बाबांची आज्ञा प्रमाण म्हणून हेमाडपंत ( अण्णासाहेब ) लगेच शामाच्या घरीं गेले. स्नानकरून धोतर नेसत शामराव बाहेर आले. तोंडानें नामाची गुणगुण करीत ते आण्णाला म्हणाले, आपण आतां यावेळी येथें कसे ? क्षणभर आपण बसा पानाचा विडा घ्या, मी देवावर पाणी घालून लगेच येतों आणि मग आपण वार्तालाप करूं. या प्रमाणें सांगून ते घरांत गेले. आण्णासाहेबानी खिडकींत ठेविलेली नाथभागवताची पोथी वेळ जाण्यासाठी सहज उघडली तों काय चमत्कार सांगावा ! इतर कांही भक्ताप्रमाणें ज्ञानेश्वरी, नाथभागवत यांचा नित्य पाठ करण्याचा आण्णासाहेबांचा नियम होता त्या दिवशीं मंडळी मशीदींत जाव याव निघालेली पाहून आण्णांनी नित्यपाठ पुरा न करितां अर्धा कथाभाग तसाच ठेवून बाबांच्या गोष्टी ऐकण्यास मंडळी बरोबर धांव मारली होती. तेव्हां शामाच्या घरी पोथी उघडतांच सकाळचा अपुरा भागच पुढें आला. तेव्हां आपला नियम चुकू नये एतदर्थ बाबांनी मला येथें पाठविलें ही त्यांची कृपाच होय. असें वाटून त्यांनीं तो अपुरा राहिलेला भाग वाचून पुरा केला. इतक्यांत देवपूजा आटपून शामराव बाहेर आले. पंधरा रुपये दक्षिणा शामाकडून घेऊन ये' असा निरोप आण्णांनी सांगतांच शामराव म्हणाले कीं रुपयाऐवजी आमचे पंधरा नमस्कार हीच आमची दक्षिणा घेऊन चला. ती दक्षिणा पदरीं बांधून आण्णा पुढें म्हणाले कीं, आपल्याजवळ गोष्टी करणेसही बाबांनी सांगितले आहे. तेव्हां त्यांच्या पावनी कथा सांगुन माझें श्रवण पांग फेडा आणि त्यांच्या यशोगंगेनें मला पुनीत करा. तेव्हां शामराव म्हणाले या देवाचा खेळच असा और आहे. हें तुम्ही सर्व जाणतांच. ही पानसुपारी घ्या मी टोपी घालून आतां येतों. बाबांच्या लीला मी किती म्हणून तुम्हांला सांगु ? आपण शिरडीस आल्यापासुन थोड्या कां लीला पाहिल्या आहेत ? मी तर खेडवळ, आपण नागर, तेव्हां बाबाच्या अकलअतर्क्य लीला आपणापाशीं कशा सांगाव्या ? असे म्हणून ते आंत गेले आणि देवास फूलपान वाहून डोईस टोपी घालून बाहेर आले आणि आण्णासाहेबाबरोबर बोलत बसले. ते म्हणाले या देवाची ( बाबाचीं ) लीला अतर्क्य आहे. त्यांच्या लिलांना अंत नाहीं. याची कळा कोण जाणुं शकेल ? हा खेळ खेळून खेळाहून निराळा आहे. आम्हां गांवडळांना काय कळतें ? बाबा काय स्वतः

गोष्टी सांगत नाहीत. आपल्यासारख्यांना आमच्यासारख्या मूर्खांपुढें तें कां पाठवितात त्यांची करणी तेच जाणतात. त्यांची कृति मानवी नाही. इतकी प्रस्तावना करून शामराव म्हणाले आतां मला सहज ओघानें एक बरी गोष्ट आठवली ती सांगून वेळ साजरी करूं. या गोष्टीतील प्रकार प्रत्यक्ष आम्हीं पाहिलेला आहे, जास्त भक्तांचा निर्धार असेल तसाच बाबा तो पार पाडतात, केव्हां केव्हां बाबा भक्तांचा अंत पहातात, त्यांचे भक्ति-प्रेम कसास लाविल्यानंतर उपदेश देतात. 'उपदेश' हा शब्द कानी पडतांच आण्णा-साहेबांच्या मनांत एकदम 'चक्र' झालें. त्यांना साठ्यांची गुरुचरित्र कथा आठवली आणि आपल्या चंचल मनाला स्थैर्य देण्यासाठी बाबांनी ही घटना [ शामाकडे पाठविण्याची ] केली नसेलना असें वाटलें. आण्णासाहेबांनी ही वृत्ति दाबली आणि ते शामरावाच्या गोष्टी ऐकू लागले. त्या गोष्टी ऐकतां ऐकतां बाबांची भक्तवत्सलता पाहून आण्णासाहेबांच्या मनाला आनंद वाटूं लागला इतक्यात एका देशमुखीण बाईची कथा सुरू झाली. ही खाशाबा देशमुखाची आई इचें नांव राधाबाई. बाबांची कीर्ति ऐकून ही बाई संगमनेरच्या लोकांबरोबर शिरडीस आली. आणि बाबाचे यथासांग दर्शन घेऊन समाधान पावली. बाई वयानें म्हातारी होती. बाबांवर तिची फार निष्ठा होती. बाबालाच गुरु करून त्यांचेकडून कांहीं कानमंत्र घ्यावा अशी त्या बाईची तीव्र इच्छा होती. ती दुसरे कांहीं जाणत नव्हती. बाबा जोपर्यंत उपदेश [ मंत्र ] देणार नाहीत तोपर्यंत प्रायोपवेशन करावयाचें असा तिनें निर्धार केला आणि तिनें खाणेपिणें वर्ज्य करून उतरलेल्या ठिकाणीं धरणें धरून बसली. याप्रमाणें तीन दिवस तिनें खडतर तप केलें. आधींच वयानें म्हातारी आणि तिनें मांडलेले निर्वाण पाहुन माझ्या मनांत विचार आला कीं, या बाईची कांहीं धडगत दिसत नाहीं, ती तर मरणाला भीत नाहीं तेव्हां या भवितव्याला काय करावे ? नंतर मी बाबापाशीं गेलों. बाबांनी सर्व कांही समाचार ठीक आहे ना असें विचारतांच मी त्यांना म्हणालों, देवा हें काय गौडबंगाल आपण आरंभिले आहे, आपला खेळ दुसरा कोण जाणणार ? आपण अनेक माणसे येथें खेचून आणतां आणि आम्हांला त्यांचे विषयीं विचारतां, ती देशमुखीणबाई, म्हातारी आलेली आहे ना, ती तुझेवर सर्व भार टाकून तीन दिवस अन्नपाण्यांवाचुन राहिली आहे. ती म्हातारी फार हट्टी पण तिला तूं कष्टी कां करतोस ! आधींच ती शुष्क काष्ट आहे, दुराग्रही महाखाष्ट आहे, अन्नपाण्यावाचून तिचे प्राण जातील आणि लोक म्हणतील की, उपदेशांची वासना धरुन ही बाबाच्या दर्शनाला गेली, पण बाबांना तिची कांहीं करुणा न येतां त्यांनीं तिला मरणाधीन केले. अशा प्रकारचा

प्रमाद किंवा अपयश आपल्या माथी येईल याचा विचार करा. याकरितां तिचेवर कांही प्रसाद करा आणि अपयश टाळा. त्या म्हातारीनें त्रागा मांडिलेला आहे, तिचे-वर कांहीं अनुग्रह केला नाहीं तर तिची धडगत दिसत नाही, तिला कांहीं तरी उपदेश स्वमुखानें सांगा म्हातारीचा विग्रह पाहुन बाबांनी तिचेवर अनुग्रह केला आणि तिच्या मनाचा ग्रह फिरविला ती अभिनव कथा ऐका.

बाबांनीं तिला आपले समोर बोलावलें आणि मोठ्या प्रेमळपणें तिला म्हटलें हे आई [टीप- बाबांची संबोधन तऱ्हा कशी असे याविषयी हेमाडपंत सांगतात:—

कोणी-ही असो प्रौढबाई । तिजला हाक मारित 'आई' ॥
पुरुषांस 'काका' 'बापू' 'भाई' । गोड नवलाई हाकेची ॥४१॥
अंतरंग जैसे प्रेमळ । बोलही तैसेच मंजूळ ॥
रंजल्या गांजल्याचे कनवाळ । दीनदयाळ श्रीसांई ॥४२॥

श्रीसांई सच्चरित १९

तूं हें धरणं कां घेतलंस, तुला हें मरण कां आठवलं? हे आई, तूं आपल्या जिवाचे व्यर्थ हाल कां करितेस, मी फकीर आहे, तूं माझी खरीच आई आहेस, मी तुझा लेक आहे, तुझेकडे मी भिक्षा मागतों, तूं आपलें लक्ष्य दे आणि मी तुला एक माझी नवल कथा सांगतो, ती तूं नीट ऐकिलीस तर ती परम सुखदाई होईल. माझा एक गुरु होता, तो कृपासागर मोठा अवलिया होता. मी त्याची सेवा कर करून थकलों, तरी तो मला कांहीं कानमंत्र देईना. गुरुची कास कधींहि सोडूं नये, दीर्घ सायास करून त्याचे मुखांतून मंत्र घ्यावा ही माझ्या मनीं प्रबळ इच्छा होती. पण प्रथम त्यानें माझें मुंडन केले आणि दोनच पैसे दक्षिणा मागितली. मी ती तात्काळ देऊन टाकिली. माझा गुरु पूर्णकाम होता, तर त्याला दोन पैशाची काय जरुरी होती, जो शिष्याकडे पैसे मागतो त्या गुरुला निष्काम कसें म्हणावें अशी शंका मनांत येईल तर स्पष्ट सांगतो कीं, त्यांना व्यवहारीक पैशाची कामना मुळीं नव्हतीच. त्यांना द्रव्य कांचन घेऊन काय करावयाचें? त्यांनीं मागितलेले दोन पैसे म्हणजे निष्ठा आणि सबूरी हेच होत, दुसरे नव्हते. [टीप:—

गुरु जरीं महा प्रबळ । अपेक्षी शिष्यप्रज्ञाच केवळ ॥
गुरुपदीं निष्टा सबळ । धैर्यबळ सबूरी ॥९८॥ श्रीसांईसचरित अ. १९ ]

मी माझ्या गुरुच्या पायाचा आश्रय एक तप-बारावर्षे केला. मला गुरुनें लहानाचा मोठा केला. अन्नवस्त्रास कांहीं तोटा नव्हता. त्यांच्या पोटीं अनिवार प्रेम होतें. तो केवळ भक्तिप्रेमाचा पुतळा होता, त्याला शिष्याचा खरा जिव्हाळा, माझ्या गुरुसारखा गुरुच विरळ', त्यांचा सुखसोहळा वर्णन करवत नाही. त्याच्या प्रेमाचें वर्णन काय करूं? त्यांच्या मुखाकडे पाहिले तर ती मूर्ति नेहमी ध्यानस्थ दिसे, आम्हां उभयतांना अत्यानंद होत असे. मी दुसरें कांहीं पाहत नसें. मी आहोरात्र गुरुमुखावलोकन करीत असे. मला भूकतहान याची स्मृति नसे गुरुवांण मात्र माझें मन अस्वस्थ असे. त्यांचोशीवाय ध्यान नाही, दुसरें लक्ष नाहीं, तेच माझे अनुसंधान होय अशी माझी निष्ठा गुरुपदी होती. ( एक पैसा दक्षिणा ), आतां दुसरा पैसा दक्षिणा म्हणजे सबुरी. सबुरी म्हणजे धैर्य, दम किंवा धीर धरणें.

"धैर्य तीच गे बाई सबुरी । सांडू नको तिजला दुरी ॥
पडतां केव्हां ही जडभारीं । हीच पैर पारी नेईल ॥९३॥
पुरुषांचे पौरुष ती हीं सबुरी । पाप ताप दैन्यता निवारी
युक्ति प्रयुक्ति आपत्ति वारी । वाजूस सारी भय भीती ॥९४॥
सबूरीवरी यशाचा वाटा । विपत्ति पळवी बारा वाटा ॥
येथ अविचाराचा काटा । नाहीं ठावका कोणाही ॥९५॥
सबूरीं सद्गुणांची खाणी । सद्विचार रायाची हे राणी ॥
निष्ठा आणि या सख्या बहिणी । जीव प्राण दोघींसी " ॥९६॥

श्रीसांईसच्चरित्र अ. १९

माझ्या गुरूच्या अपेक्षे प्रमाणें ही दोन दिडक्या दक्षिणा मी देऊन टाकिली. माझ्या गुरूनें यापेक्षां दुसरी कसली अपेक्षा केली नाहीं. आणि माझी कधींही उपेक्षा न करितां संकटकाळीं सदैव माझी रक्षा केली. कधी मी त्यांचे पायांपाशीं रहात असे, तर केव्हां केव्हां दूर परदेशांत राहीं. पण त्यांच्या प्रेमसुखाला मी कधीं अंतरलें नाहीं.

कांसवी जशी परतीरावरील आपल्या पिलांना नुसत्या प्रेमदृष्टीनेंच चारा घालते आणि पुष्ट करिते तशीच माझ्या गुरुची तऱ्हा होती. हे माई, या मशिदींत (द्वारकामाईत) बसून खरें सांगतो, तें तूं प्रमाण मान. माझ्या गुरुनें माझेच कान फुंकले नाहीत (कान मंत्र दिला नाहीं) तर मी तुझे कान कसे फुंकू? गुरुंच्या कूर्मदृष्टीनेंच शिष्यावर अमृतवृष्टि होऊन त्यांना स्वानंदसुखाचा लाभ होतो हें तूं नीट ध्यानांत ठेव आणि उगीच मंत्राच्या खटपटीत पडूं नको, तर तूं आतां जा, अन्नग्रहण कर' उगाच जीवाला अपाय करूं नकोस

"एक मजकडे लक्ष्य देई। परमार्थ येईल हातास" ॥७२॥

तूं माझ्याकडे अनन्य दृष्टीनें पहा मीही तुजकडे तसेंच पाहीन. माझ्या गुरुनें मला याहून दुसरें कांहीं शिकविलें नाहीं

" नलगे साधन संपन्नता। न-लगे षड्शास्त्र चातुर्यता ॥
एक विश्वास असावा पुरता। कर्ता हर्ता गुरु ऐसा ॥ ७४॥
म्हणुनि गुरुची थोर महती। गुरु हरिहरब्रह्म मूर्ति ॥
जो कोण जाणे तयाची गती। तो एक त्रिजगतीं धन्य गा ॥
येणेंपरी ती म्हातारी बोधितां। ठसली तियेचे मनीं ती कथा॥७५॥
ठेवूनि महाराजांचे पायीं माथा। व्रत निवृत्तता आदरिली ॥

श्रीसाईसच्चरित्र अ.१९

याप्रमाणें ही समूळ कथा ऐकून, तिची समर्पकता आणि सार्थकता पाहून अण्णासाहेबांना सानंद विस्मय वाटला. बाबांची ही लिला पाहून परमानंदानें त्यांचा कंठ दाटला, प्रेमाद्रेकानें त्यांना गहिंवर आला आणि त्यांचा अंतरी सद्बोध ठसला. अण्णासाहेबांची अशी सद्गदित वृत्ती पाहून शामराव त्यांना म्हणले, कांहो अण्णासाहेब आपण गहिंवरला आणि असें स्वस्थ बसलां, अशा बाबांच्या अगणित लीला किती म्हणून सांगू?

याप्रमाणें आपण चालले असतां मशिदींतील घंटा ऐकूं आली. जेवणाआधींच

बाबांची सविधि पूजा होऊन बाबांच्या गजरात बापूसाहेब जोग पंचारती करीत होते. शामराव व आण्णासाहेब मशिदीकडे आले आणि पाहातात तो मंगल वाद्यांच्या गजरांत आणि तासाच्या झणत्कारांत उच्च स्वरानें आरत्या म्हटल्या जात होत्या. मशिदींत अतिशय गर्दी होती, बायका मशिदींत वर होत्या आणि पुरुष मंडळी खाली मंडपांत होती. त्या गर्दीतून शामराव पायऱ्या चढून वर गेले आणि आण्णासाहेबांनाही त्यांनीं आपल्यामागून खेचून वर घेतलें. शामराव बाबांच्या दक्षिण बाजूस बसले आणि आण्णासाहेब सन्मुख बसले त्यांना पाहून शांतमूर्ति बाबा म्हणाले शामरावांनीं किती दक्षिणा दिली ती घ्या, आण्णासाहेब उत्तरले--बाबा हे शामराव येथेंच आले आहेत, दक्षिणेऐवजीं आपले नमस्कार घ्या असें त्यांनीं सांगितलें. नंतर बाबा म्हणाले—दक्षिणा असो द्या, आपण उभयतां बोललां का, ज्या कांहीं वार्ता केल्या असतील तर त्या समग्र सांगा. यावेळीं आरतीचा मोठा गजर चाललेला होता, तरी गोष्ट सांगावी ही मोठी उत्कंठा आण्णासाहेबांना लागून त्यांच्या मुखांतून ती बाहेर पडूं लागली. बाबाही तक्क्यास टेकून बसलेले होते तरी, ती गोष्ट ऐकण्यास पुढें सरसावले. आण्णासाहेबांनींही पुढें होऊन सांगणेस सुरू केली. बाबा आम्ही ज्याकांहीं वार्ता केल्या त्या सर्व चित्ताला गोड वाटल्या. त्यांतच एक म्हातारीची कथा अति अपूर्व(नवल) वाटली. शामरावानें ती कथा सांगतांच आपली अकल अतर्क्य लीला स्पष्ट दिसून आली, त्या कथेच्या मिषानें आपण मजवर खरोखर अनुग्रहच केलात. बाबा उत्सुकतेनें म्हणाले,- ती कथा समग्र सांग; ती अपूर्व आहे, अनुग्रह कसा केला हें पाहूं. ताजी ऐकलेली आणि मनांत चांगली ठसलेली ती गोष्ट आण्णासाहेबांनीं अस्खलित निवेदन केली. ती ऐकून बाबा प्रसन्न चित्त झाले आणि आण्णासाहेबांना म्हणाले—हें नीट अंतःकरणांत बाळगा हं. पुनः अति उल्हासानें विचारूं लागले कीं, किती ही गोड कथा ऐकिली तरी ती तुमच्या मनांत ठसली कां ? आणि खरीच सार्थकता मानली का? त्यावर आण्णासाहेब म्हणाले—बाबा, माझ्या मनाची आर्ति जाऊन मला खरी विश्रांती मिळाली आणि मला खरा मार्ग निश्चितपणें कळून आला. यावर बाबानीं काय उपदेश केला तो हेमाडपंताच्या शद्बांतच सांगू.

मग बाबा वदतीं तयावरी । कळाच आमची आहे न्यारी ॥
ही एकच गोष्ट जीवीं धरी । फार उपकारी होईल ॥ १०४ ॥
आत्मयाचे सम्यग्विज्ञान । सम्यग विज्ञाना कारण ध्यान ॥

तें ध्यानाचि आत्म्यानुष्ठान । तेणेंच समाधान वृत्तिचें ॥ १०५ ॥
होऊन सर्वैषणा विनिर्मुक्त । ध्याना आणावा सर्व भूतस्थ ॥
ध्यान होईल व्यवस्थित । प्रासन्य प्राप्त होईल ॥ १०६ ॥
केवल जे मूर्त ज्ञान । चैतन्य अथवा आनंद घन ॥
तेंच माझे स्वरुप जाण । ते नित्य ध्यान करी गा ॥१०७॥
जरी न आतुडे ऐसे ध्यान । करी सगुण रूपानुसंधान ॥
मनीं नखशिखांत मी सगुण । रात्रंदिन आणावा ॥ १०८ ॥
ऐसें करितां माझे ध्यान । वृत्ति होईल एकतान ॥
ध्याता ध्यान ध्येयाचे भान । नष्ट होऊन जाईल ॥ १०९ ॥
एवं ही त्रिपुटी विलया जातां । ध्याता पात्रे चैतन्य घनता ॥
तीच कीं ध्यानाची इतिकर्तव्यता । ब्रह्मसमरसता पावसी ॥११०॥
कासवी नदीचे ऐल कांठीं । तिची पिल्ले पैल तटीं ॥
ना दूध ना ऊब केवळ दृष्टी । देई पुष्टी बालका ॥ १११ ॥
पिलियां सदा आईचें ध्यान । नलगे कांहींच करणें आन ॥
नलगे दुग्ध ना चारा ना अन्न । माता निरिक्षण पोषण त्या ॥११२
हें जें निरिक्षण कूर्मदृष्टि । ही तो प्रत्यक्ष अमृत वृष्टि ॥
पिलींया लाधे स्वानंदपुष्टी । ऐक्य सृष्टी गुरुशिष्यां ॥ ११३ ॥
होतां हा साईमुखें उच्चार । थांबला आरतीचा गजर ॥
श्री सच्चिदानंद सद्गुरु जयजयकार । केला पुकार सकळांनी ॥११४

श्री साईसच्चरित्र अ. १९

प्रिय वाचक हो, आपणहि यावेळीं द्वारकामाईत त्या गर्दीत उभे आहोत असें मनानें मानुया आणि सर्व मंडळी बरोबर त्रिवार गजर करूं या बोला--

" श्रीसच्चिदानंद सदगुरु श्रीसाईमहाराज की जय "

आरती आटपल्यावर प्रसाद वाटणेस सुरवात झाली. श्री जोगानी नित्यक्रमानुसार नमस्कारपूर्वक प्रेमपुरःसर ओंजळभर खडीसाखर बाबांच्या हातांत दिली. ती त्यांनीं संबंध आण्णासाहेबांच्या हातीं रिचविली आणि पुनः बजाविले कीं, ही गोष्ट चित्ती ठेविल्यास, तुझी स्थिती खडी साखरे सारखी गोड होईल, तुझे मनीचे कोड पुरेल आणि तुझे कोट कल्याण होईल. आण्णानी नमस्कार केला आणि मागितले की अशीच कृपा असावी, आशिर्वाद असावा आणि मला सांभाळून घ्या म्हणजे झाले. तेव्हां—

बाबा वदती कथा श्रवण। करा मनन आणि निधिध्यासन ॥
होईल स्मरण आणि ध्यान। आनंदघन प्रगटेल ॥ १२० ॥

श्री साईसच्चरित अ. १९

प्रिय वाचक हो, आण्णासाहेबांना खडीसाखरेचा प्रसाद मिळाला, तसाच या कथेंतील अमृत हाच खऱ्या खडीसाखरेचा प्रसाद आम्हाला मिळत आहे. तो सेवून मनन निदिध्यासानें पचवून आपण सर्व बाबांच्या कृपेनें पुष्ट होऊं या तथास्तु.

# श्रीसांईगाथामृत

## प्रकरण ४ थें.

---

### चणकलीला. अथवा फुटाण्याची कथा.

सद्गुरुस्मरण केलियाविण । विषयसेवन न करावा ॥

श्रीसांईसच्चरित. ५२.७७

आ... या प्रकरणांत अगदीं क्षुल्लक गोष्टीमध्यें थट्टा विनोद करून श्रीसांईबाब कशी उच्च शिकवण देत हें सांगू.

थट्टा विनोद कोणास आवडत नाहीं ? सर्वांना आवडतो. पण बाबांच्या थट्टा विनोदाची रीत अलौकिक असे. थट्टेतूनहि ते सर्वांना हितकारक शिक्षण देत.' बरी नव्हे ही थट्टा' असा उपदेश पुष्कळ वेळां दिला जातो तरी लोक बाबांच्या थट्टेस लांचा वलेले असत आणि आपल्या वांटेस ती कधी येईल अशी वाट पहात असत. एकदा अण्णासाहेबांना असा लाभाचा प्रसंग प्राप्त झाला ती कथा सादर ऐका.

दर रविवारी शिरडीस मोठा बाजार पूर्वीपासून भरत असतो. उघड्या जागेवर पाल देऊन मोठे उदीम व्यापार चालतात. रस्त्यावर भाजीपाल्याचे ढीगचेढीग पड लेले असतात. तेलीतांबोळी आपली दुकानें चव्हाट्यावर लावितात. अशा एका रविवारी दुपारी आण्णासाहेब बाबांचे पादसंवाहन करीत बसले होते. नित्य दुपारीं मशिदींत चिकार गर्दी असे. त्यांत रविवार आणि बाजाराच्या वेळी लोकांची गर्दी अनिवार लोटत असे. आण्णासाहेब खाली मान घालून नामस्मरण करीत. बाबांचे पाय चेपीत होते. शामराव ( माधवराव ) डाव्या बाजूस, वामनराव दक्षिणेस असून, श्रीमंत बुटी आणि काकासाहेब दिक्षीत हे तेथें सेवेसाठी हाजर होते. इतक्यांत माधवराव हांसून म्हणाले आण्णासाहेब, आपल्या कोटाच्या अस्तनीत हे दाणे कसले डकलेले दिसतात ? असे म्हणून त्यानी तेथें स्पर्श केला मात्र तो, कोटाच्या वळ्यांत दाणे आहेत असे दिसले आणि हे काय म्हणून आण्णासाहेबांनी डावें कोपर लांब करितांच एकदम फुटाणे गड- गडून खाली पडले. ते पांचपंचवीस फुटाणे मंडळीनें टिपून घेतले.

हा विषय थट्टेस कारण झाला. जो तो तर्क करूं लागला की; कोटाच्या वळया त्या किती आणि त्यांत हे इतके फुटाणे मावले कसे ? तेथें ते मूळ आले कसे ? आण्णा- साहेबांनाहि आश्चर्य वाटलें. कीं, इतकावेळ मी पादसंवाहन करीत आहे, तरी फुटा- ण्याचा कांहीं भास नव्हता, आतां मध्येंच हे कोठून पैदा झाले आणि ते कोटाच्या वळयांत कसे राहिले ? या प्रमाणें सर्व जण आश्चर्यांत मग्न असतां काय संवाद झाला तो ऐका.

बाबा म्हणाले—याला ( आण्णाला ) एकटे खाण्याची वाईट संवय आहे आज बाजार आहे, ती संधी साधुन फुटाणे रगडीत हा येथे आला. त्याची संवय मला माहित आहे. हे फुटाणे, या संवयीचा पुरावा आहे यांत आश्चर्य तें काय ?

आण्णासाहेब—बाबा, कोणाला न देतां एकटे खाण्याचे मला माहित नाहीं, मग ही खोडी ( वाईट-संवय ) माझे अंगी व्यर्थ कां चिकटवितां मी आजपर्यंत शिरडीचा बाजार पाहिला नाहीं. मी बाजारांत गेलो नाही तर फुटाणे घेणार कसे ? आणि घेतले नाहींत तर ते खाणार कसे ? जवळपास असलेल्या दुसऱ्या कोणासहि दिल्याशिवाय मी कोणतीहि वस्तु तोंडांत घालीत नाहीं.

बाबा—जवळपास असलेल्यांना तूं देतोस हें खरें. पण तसें कोणी सन्निध नसेल तर त्याला तूं काय करणार आणि मी काय करणार ? पण मला तरी तूं आठवतोस काय ? मी नेहमी तुझ्याजवळ नाहीं काय ? तेव्हां मला तूं केवळ ( ग्रास ) खाण्या- आधीं अर्पण करतोस काय ?

फुटाण्याच्या मिषानें बाबांनी शिकविलेलें हें सकृद्दर्शनी अल्प वाटणारे, पण अत्यंत महत्वाचें तत्व अण्णासाहेबांच्या शब्दांतच सांगू या.

मन बुद्ध्यादि इंद्रियगण । करूं आदरितां विषय सेवन ॥
करावें आधीं माझें स्मरण । ते मज समर्पण अंशांशें ॥ ४६ ॥
इंद्रियें विषयांविण राहती । हें तों न घडे कल्पांती ॥
ते विषय जरी गुरुपदीं अर्पिती । सहजी असक्ति राहील ॥ ४७ ॥
काम क्रोध अभिमान । वृत्ती जवळ उठती कडकडून ॥

मी एक लक्ष्य लक्षून । मजवरी निक्षून सोडाव्या ॥ ४९ ॥
क्रमें क्रमें येणें परी । वृत्ती निकृंतन करील हरी ॥
मग या विकारत्रयाच्या लहरी । तो परिहरील गोविंद ॥ ५० ॥
किंबहुना हें विकार जात । मत्स्वरूपीच लय पावत ॥
किंवा मद्रूपाचे ते स्वयें होत । विश्रामत मत्पदीं ॥ ५१ ॥
ऐसे होतां अभ्यसन । वृत्ति स्वयेंच होती क्षीण ॥
कालांतरें समूल निर्मूलन । वृत्ति शून्य मन होई ॥ ५२ ॥
यत्किंचित विषय सेवनीं । बाधा आहेत सन्निधानी ॥
सेव्याऽसेव्यता विचार मनीं । सकृद्दर्शनी उठेल ॥ ५५ ॥
असेव्य विषय सहजचि सुटे । व्यसनी भक्ताचें व्यसन तुटे ॥
असेव्यार्थी मनहि वाटे । वळवितां नेहटें हें वळण ॥ ५६ ॥
विषय नियमनीं होई सादर । वेद त्या नियमाचा आकर ॥
विषय सेवी मग नियमानुसार । स्वैच्छाचार वर्तेना ॥ ५७ ॥
ऐसी सवई लागतां मना । क्षीण होती विषय कल्पना ॥
आवडी उपजे गुरुभजना । शुद्धज्ञाना अंकुर ये ॥ ५८ ॥
शुद्ध ज्ञाना लागतां वाढी । देह बुद्धीची तुटे बेडी ॥
ते बुद्धि दे अहंब्रम्ही बुडी । सुख निर्वडी । मग लाहे ॥ ५९ ॥
जरी हा देह क्षण भंगुर देख । तरी हा परम पुरुषार्थ साधक ॥
जो प्रत्यक्ष मोक्षाहून अधिक । कीं भक्तियोग प्रदायक हा ॥ ६० ॥

---

गुरु आणि देवयांत । भेद पाही जयाचें चित्त ॥
तेणे अखिल भागवतांत । नाहींच भगवंत देखिला ॥ ६३ ॥
सांडूनिया द्वैत दर्शन । गुरु देव अभिन्न जाणावे ॥ ६४ ॥

घडतां गुरुसेवा निर्मळ । होईल विषय वासना निर्मूळ ॥
चित्त होईल शुध्द सोज्वळ । स्वरूप उज्वळ प्रगटेल ॥ ६५ ॥

**शेवटीं या कथेचें सार थोडक्यांत सांगतात,**

परि या कथेचें सार काय । तेथेंच आपण घालूं ठाय ॥
पांचापोटीं कोणताहि विषय । वात्राशिवाय सेवूं नये ॥ ६९ ॥
मनास देतां ही शिकवण । वेळोवेळीं होईल आठवण ॥
देतां घेतां साईचरण । अनुसंधान राहील ॥ ७० ॥
हे शुध्द ब्रह्म सगुण मूर्ति । नयना समोर राहील निश्चिती ॥
उपजेल भक्ति मुक्ति विरक्ति । परम प्राप्ती लाधेल ॥ ७१ ॥
नयनीं देखतां सुंदर ध्यान । हरेल संसार भूकतहान ॥
हरपेल ऐहिक सुखाचें भान । मन समाधान पावेल ॥ ७२ ॥

---

ही चणकलीला सांगतांना आण्णासाहेबांना सुदाम कथा आठवली. ती त्यांनीं यापुढें दिली आहे, त्या कथेंतहि हेंच तत्व सांगितलें असल्यामुळें ती ही येथें थोडक्यांत देत आहे.

बलराम आणि कृष्ण सांदीपनी गुरुच्या घरी असतां एकदां लांकडें आणण्यासाठी त्यांना वनांत पाठविलें होते. त्यांनतर गुरूपत्नीनें त्याच कामावर सुदामालाहि पाठविलें आणि तिघांकरितां त्याचेकडे भुकेच्या शमनार्थ चणे [ फुटाणे ] दिले. पुढें रानांत कृष्ण भेटला असतां तो सुदाम्याला म्हणाला, दादा, मला तहान लागली आहे सुदाम्यानें उत्तर दिलें की, अनशेपोटी पाणी पिऊं नये, थोडी विश्रांती घ्यावी. पण हे मजपाशी चणे आहेत ते खा असें तो काहींच बोलला नाहीं. कृष्ण हा थकलेला असल्यामुळें सुदाम्याच्या मांडीवर पहुडला. त्याचा डोळा लागलेला आहे असें पाहून सुदाम्यानें चणे खाण्यास सुरुवात केली. दादा काय हो खातां, हा अवाज कसला असें कृष्णानें मध्येंच विचारिलें. सुदामा म्हणाला, खायला: येथें काय आहे रे, थंडीनें दांत कुडकुडतात, विष्णु सहस्त्रनामहि स्पष्ट म्हणतां येत नाही, त्याचा हा आवाज आहे. सुदाम्याचे हें उत्तर ऐकून सर्वसाक्षी कृष्ण म्हणाला दादा मला असें एक स्वप्न

पडलें कीं, एकाची वस्तू दुसरा खात असतां, त्याला काय खातोस असें विचारतां, काय माती खाऊ, असें त्यानें उत्तर दिलें. तथास्तु असें दुसऱ्यानें उत्तर दिलें. दादा, हे स्वप्नच खरं का, आपण माझ्याशिवाय कधी तरी खाल काय, पण स्वप्नांच्या नादांतच तसा प्रश्न मी विचारला. श्रीकृष्ण लीला त्याचे स्वरूप यांची कांहीं माहिती सुदाम्याला असती तर त्यानें असा प्रकार केला नसता. पण पुढें तो श्रीकृष्ण--परमात्म्याचा सखा असूनहि त्याला अठरा विश्व दारिद्य भोगावें लागलें. ही गोष्ट एकटेंच खाण्याची ज्यांना सवय आहे त्यांनीं नीट लक्षांत ठेवावी. त्याच सुदाम्यानें जेव्हां स्वस्त्रीकष्टार्जित मुठभर पोहे श्रीकृष्णाला प्रेमानें अर्पण केले, तेव्हां प्रसन्न होऊन श्रीकृष्णानीं त्याला कसें ऐश्वर्य संपन्न केलें त्याविषयीं कविवर्य मोरोपंत सांगतात—

"ऋणतरी मुष्टिभरी पोहे
त्याच्या व्याजांत हेमनगरी तीं।
मुदलांत मुक्ति देणें
हे कोण्या सावकारिची रीती ॥"

या करिता श्रुतिमाऊली आम्हाला असा उपदेश करिते कीं **"तेन त्यक्तेन भुंजीथा"** इशोपनिषत् ( त्याला-परमेश्वराला समर्पण करून नंतर त्याचा शेष-प्रसाद म्हणून विषयाचा उपभोग घे ) हाच उपदेश, हेंच तत्त्व बाबांनीं सहज थट्टाविनोदानें भक्ताच्या मनीं ठसविलें त्याप्रमाणें सर्वांचें आचरण त्याच्या कृपेनें होवो हें मागून हें प्रकरण पुरें करितों.

# श्रीसांईगाथामृत

## प्रकरण ५ वें.

——०——

### बाबाच्या छबीचें दर्शन म्हणजे प्रत्यक्ष बाबाचें दर्शन.

'प्रतिमा तो देव कैसा नोहे'? —श्री तुकाराम.

या प्रकरणांत बाबा छबीरूपानें दर्शन देऊन आपल्या भक्तांच्या मनकामना कशा पूर्ण करीत हें पाहूं

प्रथम हेमाडपंताची (आण्णासाहेब दाभोळकर यांची) गोष्ट घेऊं. १९१७ सालची गोष्ट फाल्गुन शुद्ध पौर्णिमेस त्यांना पहांटेस एक मजेदार स्वप्न पडलें. एका सुंदरवेषी संन्याशाच्या रूपानें बाबांनीं स्वप्नांत येऊन त्यांना जागृत करून सांगितलें कीं, आपण आज भोजनास येणार आहो. स्वप्नांतील जागृतपण हें सुद्धां स्वप्नच पण खरेखुरें जागृत झाल्यावर आण्णासाहेब पाहतात तों, संन्यासी नाहीं किंवा सांई नाहीं. पण स्वप्नांत संन्याशानें उच्चारलेली अक्षरें (प्रत्येक अक्षर) त्यांना पूर्ण आठवलीं आणि त्यांना आनंद झाला. सात वर्षे जरी त्यांना सांईचा सहवास होता आणि ध्यानीं मनीं सांईचा ध्यास होता. तरी त्यांचा आपल्या घरी त्यांच्या भोजनाचा योग येणें हा भास होता असो. सकाळीं उठून त्यांनी आपल्या पत्नीला सांगितलें कीं, आज होळीचा सण आहे, एक सन्मान्य पाहुणा जेवावयास येणार आहे, तेव्हां एक टिपरी भाताचें अधिक आधण ठेवा. पाहुणा कोण याविषयीं त्यांच्या पत्नीनें चौकशी केली. तेव्हां त्यांनी स्वप्नांतील हकीकत तिला कळविली. ती म्हणाली–शिरडीहून इतक्या लांब बाबा कसे येतील शिरडीचें मिष्टान्न सोडून येथील कदान्न ते सेवितील काय अशी तिनें शंका घेतली, अण्णासाहेबानीं सांगितलें कीं, प्रत्यक्ष सांईच येतील कीं नाहीं कोण जाणें, पण कोणीतरी पाहुण्याचे रूपानें ते येतील कोणी तरी येईल खास, एक टिपरी अधिक भात करणेस तुझें काय जातें? याप्रमाणें संभाषण झाल्यावर भोजनाची सर्व तयारी माध्यान्‌-काळी झाली, यथाविधि होलीकापूजन होऊन रांगोळ्या घालून पानें मांडण्यांत आलीं. एक मुख्य पाट (पात्र) दोन्ही रांगाच्या मध्यें मुख्यवर्ती जागेवर मांडणेंत आलें. पुत्र-

पौत्र, दुहिता, जामात इत्यादि मंडळी येऊन पानावर बसली भोजनाचे सर्व पदार्थ वाढण्यांत आले. पाहुणा कोणी येतो काय याची मंडळी वाट पाहूं लागली बारा वाजून गेलें तरी कोणी अतिथि किंवा पाहुणा आला नाही. शेवटी निराश होऊन दाराच कडी लावून अन्नशुद्धि वाढली, वैश्वदेव नैवेद्य कृष्णार्पण वगैरे होऊन आता प्राणाहुती घेणार तोच जिन्यावर पावलें वाजली. आण्णासाहेब हळुच दाराची कडी काढून पाहातात तो जिन्यावर दोघेजण दिसले. ते अल्लीमहमद आणि मौलाना इस्मू मुझावर असे दोघे होते. भोजनाची तयारी आणि मंडळी पानावर बसलेली पाहुन तसदीबद्दल अल्लीमहमदानी आण्णासाहेबाची माफी मागितली. माझेकरितां पानावरून उठून आपण धांवत आलात, सर्व पंक्ति आपल्या करितां खोळंबून राहिल्या आहेत, तर आतां ही आपली वस्तु घ्या, फुरसतीनें मी सर्व या विषयीं नवलकथा सांगेन असें म्हणून खाकेंतून एक पुडकें काढून टेबलावर वृत्तपत्राच्या वेष्टनासहित एक तसबीर ठेविली. वेष्टन काढून पाहातात तो ती साईबाबांची प्रतिमा, ती पाहातांच आण्णासाहेबांच्या शरीरावर रोमांच उभे राहिले, त्यांचे अंतःकरण सद्गदित झाले म्हणून त्यांनी प्रतिमेच्या चरणावर शीर ठेविलें. साईच्या या लीलेचा त्यांना मोठा चमत्कार वाटला. असें चरित्र दाखवून बाबांनी आपणास पवित्र केलें असें त्याला वाटलें. आपण ही तसबीर कोठून आणली असें त्यांनी मोठ्या उत्कंठतेनें अल्लीमहमदाना विचारलें. ती आपण एका दुकानांतून विकत घेतली होती, त्याविषयीं सर्व कथा सावकाश मी आपणास सांगेन. मंडळी खोळंबून बसली आहे, आपण स्वस्थपणें भोजन करावें, असें सांगुन ते निघून गेले. पुढें ती तसबीर मध्यवर्ती पाटावर प्रस्थापित करण्यांत आली. नंतर अर्घ्यपाद्यादि पूजन आणि भक्ति प्रेमे नैवेद्य समर्पण होऊन भोजन समारंभ पार पडला.

पाहोनि चित्रींची सुंदर मूर्ति । परम आल्हाद सकळांप्रती ॥
कैसें हें घडलें अकस्मित रीती । आश्चर्य करिती समस्त ॥ १९७ ॥
मुग्धावले अवघ्यांचे मन । अतर्क्य साईंचें विंदान ॥
देोघांमिषें करुनि आगमन । स्वप्नींचें वचन सत्य केलें ॥ १९९ ॥

—श्रीसाई सच्चरित अ. ४०

## तसबीरीची कथा

आज नाहीं उद्यां म्हणतां म्हणतां अल्लीमहमद हे नऊ वर्षांनी

आण्णासाहेबांस भेटले आणि त्यांनी त्या तसबीरीची कथा निवेदन केली. ती थोडक्यांत येणें प्रमाणें:— मुंबईत एका चित्रें विकणाऱ्या फिरत्या व्यापाऱ्याकडून त्यांनी ती तसबीर विकत घेऊन बांद्रे येथें आपल्या घरी लाविली, बाबांचे त्याला भारी प्रेम असल्यामुळें तो आनंदानें तिचे नित्य दर्शन घेत असे. ज्या दिवशी तसबीर देण्यांत आली त्यापूर्वी तीन महिने अलीमहमद याचा पाय सुजल्यामुळें शस्त्रक्रिया करून घेण्यासाठीं तो आपला मेहुणा नूरमहमद पिरभाय यांचेकडे मुंबईस येऊन राहिला होता या तीन महिन्यांत त्याचे घरी कोणी वस्तीस नव्हते फक्त प्रसिद्ध बाबा अबदुल रहिमान, मौल,ना साब महमद हुसेन, बाबासाई, बाबा ताजुद्दिन यांची व इतर संताची चित्रें त्याचे घरी भिंतीवर लाविलेली होती. त्यांना सुद्धां काल चक्रानें सोडले नाही. संतबाबा अबदुल रहिमान यांचें एक लहान चित्र महमद हुसेन थारिया टोपण यांचेकडून बऱ्याच वर्षांपूर्वी त्याला मिळालेले होतें तें त्यानें आपल्या मेव्हण्यास दिलें होतें. त्याचा मेव्हणा हा बाबा अबदुल रहिमानचा शिष्य होता. तें चित्र आठवर्षे त्याच्या मेजाचे खणांत पडून होतें. तें एकदां दृष्टीस पडताच त्यानें ते फोटोग्राफरचे दुकानांत नेऊन मोठें करून घेतलें आणि त्याच्या पुष्कळ प्रती आप्तेष्टांस वांटल्या आणि अलीमहमदालाहि एक दिली. ती त्यानें आपल्या घरीं लाविली होती. बाबा अबदुल रहिमान यांचा दरबार भरला असतां ती सुंदर तसबीर त्यांना अर्पण करणेस नूरमहमद गेले असतां ते त्याचेवर एकदम रागावले आणि त्याला मारावयास धांवले. पैशापरी पैसा गेला आणि गुरूच्या रोषास मी कारण झालों असें वाटून नूरमहमद फार उदास आणि उद्विग्न झाला. प्रतिमापूजन आपल्या गुरुस आवडत नाहीं. तर या तसबीरीचें आपणास काय प्रयोजन असें वाटून त्यानें ती तसबीर अपोलो बंदरावर जाऊन एक होडी करून ती समुद्रांत बुडवून टाकिली. तसेंच ज्यांना ज्यांना त्यांनीं प्रती दिल्या होत्या त्यांना विनवून त्या (सहा) प्रती मागून घेऊन त्याही कोळयाकडून बांद्यास समुद्रांत बुडवून टाकल्या. अलीमहमद यावेळीं त्या मेव्हण्याच्या घरीं होते, त्यावेळीं त्यानें अलीमहमदाला सांगितलें कीं, तूं जेव्हां या संत प्रतिमा समुद्रीं विसर्जन करिशील तेव्हां तुझ्या व्यथेचें निरसन होईल हें ऐकून अलीमहमदानें बांद्यास आपला मेथा पाठवून आपल्या घरच्या सर्व तसबिरा त्याचेकडून समुद्रांत टाकविल्या. पुढें दोन महिन्यानी प्रकृतीस आराम पडल्यावर अलीमहमद घरीं येऊन पाहतात तों ही साईची तसबीर दारासमोर भिंतीवर पूर्ववत स्थिर आहे! त्यांना मोठें आश्चर्य वाटलें कीं, सर्व चित्रें आपल्या मेथाजीने नेलीं व हीच कशी राहिली? लगेच ती त्यानें

काढून आपल्या कपाटांत छपवून ठेविली. कदाचित ती आपल्या मेव्हण्याचे दृष्टीस पडली तर तो ती उठाउठी घेऊन जाईल आणि तिला जलसमाधि देईल. याकरितां ती कोणाजवळ सोंपवावी आणि कोण तिची योग्य जोपासना करील अशा विवंचनेंत असतां साईनों त्याला एक सुविचार सुचविला कीं, इस्मू मुजावर मौलानाकडे जाऊन याचा निर्णय करावा. शेवटीं तो त्याचेकडे गेला आणि त्याना सर्व हकीकत सांगितली त्या उभयतांचा शेवटी निर्णय झाला कीं, ही तसबीर आण्णासाहेबाकडेच सोंपवावी म्हणजे ती योग्य स्थानीं व निर्भय राहील. हा निश्चय ठरल्याबरोबर ते दोघे निघाले आणि त्यांनीं योग्यवेळी ती तसबीर आण्णासाहेबाना सप्रेम सादर अर्पण केली. इत्यादि कथा वर आलेलीच आहे, या कथेवरून बाबा भूत भविष्य कसें जाणत होते आणि ठिकठिकाणची सूत्रें हालवून भक्तकामना कसे पूर्ण करीत होते हे स्पष्ट होते.

या छबी दर्शनाच्या अशाच आणखी कांहीं कथा सांगून हें प्रकरण पुरें करूं.

## (२) बाळा बुवा सुतार महाराज यांची गोष्ट.

बाळाबुवा सुतार नांवाचे एक संत मुंबईस राहत असत. मी त्यांना प्रत्यक्ष पाहिलेले आहे. अजमासें १७।१८ वर्षांपूर्वी ते श्रीयुत अंबाजी गंगाराम पुळी यांच्या मधील आऊट हाऊसच्या वरच्या मजल्यावर, लॅबर्नमरोड गांवदेवी, मुंबई येथें राहत असत. ते दोन सपाट दगड घेऊन चिपळ्या सारखे वाजवून पदं अभंग वगैरे मोठ्या प्रेमानें म्हणत असत. यामुळें व त्यांचा चेहरा व अंगलट श्रीतुकाराम महाराजांसारखी दिसत असल्यामुळें आणि त्यांची वृत्ति तशीच (वैराग्यज्ञानयुक्त) असल्यामुळें लोक त्यांना 'अर्वाचीन तुकाराम' असें म्हणत असत. ते एकदां प्रथमच शिरडीस साईबाबांच्या दर्शनास गेले होते. उभयतांची दृष्टादृष्ट होतांच बाबांनी सांगितलें कीं, याची मला चार वर्षांपासून ओळख आहे. तेव्हां मी शिरडी आजच प्रथम पाहिली, बाबानीं कधीं शिरडी सोडली नाहीं असें असतां, चार वर्षांपासून ओळख आहे असें बाबा कां म्हणतात याचें बाळाबुवानां फार आश्चर्य वाटलें. पण विचार करतां करतां त्यांना आठवलें कीं, आपण चार वर्षांपूर्वी बाबांच्या छबीला नमस्कार केला होता. हें आठवल्याबरोबर बाबांच्या बोलाची त्यांना अन्वर्थकता तत्वता पटली. आणि ते म्हणाले कीं, पहा, बाबांची व्यापकता व भक्तवत्सलता कशी आहे! मी फक्त छबी नमन, प्रत्यक्ष मूर्ति आजच पाहिली, बाबांनी ओळख धरिली, मी ती कधींच हरविली होती. ओळख हरविली असे

म्हणणें यथार्थ होणार नाहीं. कारण बाबांच्या बोलाचा अर्थ मला तात्काळ कळेना. छबी नमन म्हणजे त्या छबीच्या मालकाची ओळख हें जाणण्यास मी समर्थ नव्हतो. बाबांना माझी ओळख होती. हें माझ्या गांवीं ( स्वप्नी )हि नव्हते. त्यांनीं ती जेव्हां आठवून द्यावी तेव्हांच ती पटावी हे योग्य. म्हणून याचे सार थोडक्यांत असे आहे कीं,

' म्हणून संतांच्या छबीचें दर्शन । आहे प्रत्यक्ष दर्शनासमान ॥
सर्व-दर्शी संताची जाण । तीच ही शिकवण सर्वांते ॥ १६२ ॥

श्रीसाईसच्चरित ३३-

चार वर्षांपूर्वी अन्य ठिकाणीं कोणी एका संताने आपल्या छबीस नमस्कार केला या गोष्टीची नोंद ठेवणारे आणि पुढें चार वर्षांनीं ही गोष्ट त्या संताला पटवून देणारे बाबा सर्व साक्षी सर्वदर्शी होते हें यावरून सिद्ध होतें.

## ( ३ ) श्री. काकासाहेब दीक्षीताची गोष्ट.

१९०९ पर्यंत सांई हें नांव श्री. काकासाहेब दीक्षितांना अपरीचित होते. पुढें एकदां ते लोणावळ्यास राहत असतां त्यांचे जुने स्नेही श्री. नानासाहेब चांदोरकर हे त्यांना भेटले. त्यावेळीं त्याच्या सुखदुःखाच्या वार्ता चालल्या. काकासाहेबानीं सांगितलें कीं, आपण कांहीं वर्षांपूर्वी लंडन शहरी असतां गाडींत चढतांना आपला पाय घसरला आणि अनेक उपाय केले तरी पायाची व्यथा कमी झाली नाहीं. यावर नानासाहेबानीं सांगितलें कीं, आपल्या पायाचा लंगडेपणा ( व्यथा ) निःशेष जावी असें आपणास वाटत असल्यास, आपण माझ्या सद्गुरू दर्शनास या. पुढें नानासाहेबानीं सांईबाबांची साद्यंत कथा त्याना ऐकविली आणि

" माझें माणूस किती ही दूर । असेना साता समुद्रापार ॥
चिडीसारखा मी बांधुनि दोर । ओढूनी सत्वर आणितों ॥

(श्रीसाईसच्चरित ५१. २८)

हे बाबांचें नित्यवचन त्यांना सांगून आपण बाबांचे नसल्यास त्यांचे आकर्षण व दर्शन

होणार नाही असे वजाविले. हे सर्व ऐकून काकासाहेब फार खुष झाले आणि बाबांचे दर्शन घेतों, आणि पायाचा लंगडेपणा राहू द्या, माझ्या लंगडया-चंचल मनाला ताळ्यावर आण। अशीच मी त्यांची प्रार्थना करीन, असे ते म्हणाले, पुढें कांहीं काळानंतर मुंबई लेजिसलेटीव्ह कौन्सिलच्या निवडणूकीच्या मतांसाठीं काकासाहेब दीक्षित अहमदनगरास त्यांचे स्नेही काकासाहेब मिरीकर यांचे घरीं उतरले. कोपरगांवचे मामलेदार बाळासाहेब मिरीकर (काकासाहेबांचे चिरंजीव) हे ही त्याचवेळीं घोडयांच्या प्रदर्शनासाठीं अहमदनगरीं आले होते. मतांची जुळणी झाल्यावर आणि ते काम आटपल्यावर कोण आपणास शिरडीस बाबांचे समोर घेऊन जाईल अशी त्यांना काळजी लागली. काकासाहेब दीक्षिता बरोबर कोणास पाठवावें याविषयी बाप लेक मिरीकर काळजींत असतां,--साईबाबांची योजना व चमत्कार पहा--त्यांना बातमी लागली कीं, बाबांचे जिवलग सखे शामराव (माधवराव) देशपांडे हे नगरांस आले आहेत. 'आपली सासू फार आजारी आहे, सहकुटुंब भेटीस या' अशी तार शामरावाचे श्वशुरांनी त्यांना केली होती. तार येतांच तयारी करून बाबांची अनुज्ञा घेऊन ते नगरास आले आणि श्वशुरगृहीं जाऊन पहातात तों सासूबाईची प्रकृति ठीक असून काळजी करण्याजोगी नाहीं. थोडीशी विश्रांति घेतल्यावर मिरिकरांकडून त्यांना निरोप आला. तेव्हां ते तेथें गेले त्यावेळीं त्यांची व काकासाहेबांची प्रथम भेट झाली. आणि त्याच दिवशीं दहा वाजतां काकासाहेबांना बरोबर घेऊन शिरडीस जावे असें ठरले. यापुढें नवलाची गोष्ट ही कीं, बाळासाहेब मिरिकरांनीं बाबांचे छबीवरील पडदा दूर सारला, बाबांचा निस्सीम भक्त मेघा याच्या नित्य पूजेत असलेली ही तसबीर दुरुस्तीसाठी-फुटलेली कांच बसविण्यासाठी येथें आलेली होती. ती दुरुस्त होऊन वस्त्रानें झाकून ठेविलेली होती. ही तसबीरही माधवरावाबरोबर परत शिरडीस पाठविण्याचें ठरलें. ती सर्वांगमनोहर तसबीर पाहून काकासाहेब आनंद निर्भर झाले आणि त्यांनी तिला साष्टांग प्रणिपात केला.

जयांचे दर्शनीं धारिला हेत । तयांची प्रतिमा ही मूर्तिमंत ॥
मार्गींच यावी अवलोकनांत । आल्हाद अत्यंत जाहला ॥ ७४ ॥
तिही यावी शिरडीहूनी । काकासाहेब मिरीकर भुवनी ॥
तेचवेळीं दिक्षित ते स्थानीं । योग हा पाहूनी विचित्र ॥ ७५ ॥
जैसा दीक्षितमनी भावार्थ । तैसा पुरावावया साई समर्थ ॥

वाटले या मित्रे आले येथ । निरोकर भक्त भुवनास ॥ ७६ ॥

( श्री साईसच्चरित अ. ५१ )

यानंतर ते दोघेहि आनंदानें स्टेशनवर गेले. गाडींत चीकार गर्दी होती तरी गार्डाच्या ओळखीनें त्यांची चांगली सोय होऊन ते कोपरगांवास उतरले. त्यावेळी स्टेशनावर नानासाहेब चांदोरकरांना पाहून काकासाहेबांना फार आनंद झाला. ते परस्परांना कडकडून भेटले. नानासाहेबहि बाबांच्या दर्शनासाठीं शिर्डीस जात होते. हा अनपेक्षित योग पाहून सर्वांना फार आश्चर्य वाटले मार्गांत गोदावरी स्नान करून ते शिरडीस पोचले.

"पुढें होतां साईचे दर्शन । दीक्षितांचे द्रवले मन ॥
नयन झाले अश्रू पूर्ण । स्वानंद जीवन ओसंडलें ॥ ९० ॥
मी हि तुझी पाहूनि वाट । पुढें शाम्यास पाठविला थेट ॥
नगरास तुझी घ्यावया भेट । वदले गग स्पष्ट साई तया ॥ ९१ ॥

श्रीसाईसच्चरित्र अ. ५१

श्री साईबाबांची लीला ही अशी अपूर्व आहे—

## (४) श्यामा ( माधवराव देशपांडे ) यांची गोष्ट.

वर सांगितलेल्या गोष्टीनंतर कांहीं वर्षांनी घडलेली ही गोष्ट आहे. काकासाहेब दीक्षितांचा ज्येष्ठ पुत्र बाबु याचा व्रतबंध नागपुरांत करण्याचें ठरलें. तसेंच नानासाहेब चांदोरकरांच्या ज्येष्ठ पुत्राचा विवाह ग्वाल्हेरास करण्याचें निश्चित झालें. या उभय शुभकार्यासाठीं बाबास आमंत्रण देण्यासाठीं काकासाहेब व नानासाहेब शिरडींत आले आणि त्यांनीं बाबास प्रेमपुरस्सर आमंत्रण दिले. आपला प्रतिनिधि शामा याला बरोबर घेऊन चला असे बाबांनी सांगितले. काकासाहेबांनी स्वतः येण्यास आग्रह केल्यावर बाबांनी उत्तर दिलें कीं, "काशी प्रयाग करून शाम्याचेही अगोदर येतो. वाचकांनी या बाबांच्या शब्दावर लक्ष द्यावे. म्हणजे त्यांना बाबांची सर्व व्यापकता दिसून येईल.

बाबांच्या अनुज्ञेप्रमाणें शामानी नागपूर ग्वाल्हेर येथें शुभकार्यासाठीं आणि

तेथून पुढें काशीप्रयाग वगैरेची यात्रा करणेची तयारी केली. आण्णा कोतेही त्यांचे-बरोबर निघाले. प्रथम ते नागपुरास मुंजीच्या समारंभास गेले. काकासाहेबांनीं त्यांना खर्चासाठीं दोनशें रुपये दिले. तेथून ते लग्न समारंभास ग्वाल्हेरास गेले. नानासाहेबांनी त्यांना शंभर रुपये, नानासाहेबांचे व्याही श्रीमंत जठार यांनींहि शंभर रुपये दिले हे समारंभ आटपून शामराव काशीस व अयोध्येस गेले. श्री. जठार यांच्या मुनिमानी त्यांची सर्व व्यवस्था केली. तेथून शामराव व कोते प्रयागास गेले. रामनवमीच्या उत्सवास ते अयोध्येस गेले आणि २१ दिवस तेथें राहिले. काशींत त्यांनी दोन महिने काढिले आणि तेथून पुढें ते गयेस निघाले. वाटेंत अग्निरथांत बसून जात असतां गयेंत ग्रंथिज्वराची साथ जोरांत आहे असें ऐकून ते चिंताक्रांत झाले. रात्रीं गयेस उतरून धर्मशाळेंत राहिले. पहाटे गयावळ भेटीस येऊन, 'यात्रा चालली आपण ही घाई करा' असें त्यांनीं विनविले. शामानी हळूच त्यांना विचारले कीं, तुमच्या वस्तींत ज्वराची साथ आहे कां? हे साथ वगैरे कांहीं नाहीं, तुम्ही निःशंक मजबरोबर या आणि प्रत्यक्ष पहा असें त्या गयावळानें सांगितलें. पुढें ते त्यांचे बरोबर गेले. आणि त्याचे घरीं उतरले. त्या गयावळाचा विस्तीर्ण वाडा पाहून त्यांचे अंतः-करण प्रसन्न झाले. आणखी एक चमत्कार त्यांचे दृष्टीस पडला त्या वाड्यांत समोर बाबांची छबी पाहून शामरावाना अतिशय गहिंवर आला. आनंदाश्रूनीं त्यांचे डोळे भरून आले. काशी प्रयाग करून शामाच्या आधीं येतो हे बाबांचे शब्द त्यांच्या प्रत्यक्ष प्रत्ययास आले आणि त्यांचे अंगी अष्ट सात्विक भाव प्रगट झालें. ग्रंथिज्वराची त्यांना भिती वाटून हे रडत असावें अशी त्या गयावळाच्या मनांत शंका आली. पण शाम-रावानेच त्यांना ही बाबांची छबी येथे कोठून आली असा प्रश्न केला. तेव्हां त्या गयावळानें सांगितलें कीं, मनमाड व पुणतांबे येथें माझे २००—३०० नोकर यात्रे-करूंच्या सुखसोईसाठीं काम करीत असतांना साईसमर्थ हे मोठे अवलिया आहेत असें आपण ऐकिले, तेव्हां १२ वर्षांपूर्वी मी शिरडीस गेलो आणि बाबांचे वंदनपूर्वक दर्शन घेतले. बाबांची एक छबी आपलेपाशी असावी अशी इच्छा माझे मनांत उद्भवून शाम-रावाचे घरीं भिंतीशी टांगलेली तसबीर मी मागितली, बाबांच्या अनुज्ञेने ती मला शामरावानें दिली तीच ही छबी आहे इत्यादि-- आपलीच ही छबी तोच हा गयावळ' याच ठिकाणीं मला बाबांनी कसे पाठवावे इत्यादि मागील गोष्टी स्मरून शामरावाला फार आनंद झाला. यांचेच घरी आपण उतरलो होतो. यानींच बाबांचे दर्शन करून छबी दिली हे ऐकून त्या गयावळालाहि तसाच आनंद झाला.

मग परस्पर कृतोपकार । नाहीं आनंदा पारावर ॥
ठेविली उत्तम व्यवस्था फार । त्यांनी गयेवर शामाची ॥८६॥
तया घरची काय श्रीमंती । दारीं जयाचें झुलती हत्ती ॥
आपण पालखीमाजी बैसतां । शामास बैसविती हत्तीवर ॥८७॥

श्री साईसच्चारित अ. ४६

याप्रमाणें आपल्या भक्तसख्याची यात्रा मोठ्या आनंदानें आणि गौरवानें संपूर्ण यथासांग करवून घेतली. ' असो--

या सर्व कथेचे सार । सार्थ बाबांचे मुखोद्गार ॥
अनुभवा येती अक्षरें अक्षर । प्रेमही भक्तांवर अनिवार ॥९०॥

श्री साईसच्चरित्र ४६,

## (४) माझी स्वतःची गोष्ट.

वरील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें बाबांच्या छबी दर्शनाचा मला स्वतःला या वर्षारंभी (१९४१) असाच अनुभव आला आणि हा अनुभव श्री साई लीला मासिक, वर्ष १७ अंक ११-१२ यांत प्रसिद्ध झालेला आहे. मी साईबाबांच्या दर्शनास शिरडीस जाण्याचा निश्चय केला मात्र तोंच त्यांनीं कसा योगायोग जुळवून आणिला पहा. पूर्वी मी कधीं ज्यांना पाहिलें नाहीं असें पुण्याचें एक अपरिचित गृहस्थ श्रीयुत य. ना. उर्फ भाऊराव आठवले कॉंट्रक्टर हे मला भेट- ण्यास मुद्दाम आमचे घरीं आले. शिरडीस बाबांच्या दर्शनार्थ जाणेचा मनोदय मी त्यांना कळविला. तेव्हां आपण सर्व माहिती पुरवितो. शिरडीस जातांना वाटेंत पुण्यास आपले घरी उतरावे अशी त्यानीं मला विनंति केली. पुण्यास जाऊन शिरडीस जाणेची सर्व माहिती लगेच त्यानी मला कळविली. त्याप्रमाणें शनिवार ता. २५-१-४१ रोजी रात्री मेलनें मी बेळगांव सोडले दुसरे दिवशी पहांटेस श्री. आठवले यांचे घरी गेलो. स्नान वगैरे आटपून संध्येसाठी त्यांच्या घरसांतील सुंदर रम्य देवगृहांत जातांना श्री. आठवले यांनीं तेथेंच भिंतीवर लाविलेल्या बाबांच्या छबीकडे बोट दाखवुन म्हटले कीं, हे पहा, तुमचे साईबाबा ते, हें ऐकून मी त्या छबीकडे प्रेम भावानें पाहून नमन केलें बाटेतच बाबा आपल्या भक्तांचें

स्वागत करणेस तयार आहेत हें पाहून मला फार आल्हाद वाटला. असो. सांगण्याची मुख्य गोष्ट ही की, बाबा हयात असतांना जसे ते भक्तांचें स्वागत करीत असत तसेंच ते आतांहि करीत आहेत, ही मोठ्या नवलाची गोष्ट आहे यांत संशय नाहीं.

आतां बाबांच्या छबीचे दर्शन म्हणजे प्रत्यक्ष बाबांचे दर्शन या विषयीं माझ्या अल्पमतीस सुचलेला एक खुलासा देऊन हे प्रकरण पुरें करितो.

आमचे डोळे--नेत्रेंद्रिय म्हणजे एक फोटोग्राफीचा कॅमराच आहे. नेत्रांतहि कॅमेऱ्यांतील कांचे ( lens ) प्रमाणे एक प्रकारची कांच ( lens ) आहे. यांतून सर्व पदार्थ व वस्तु यांची प्रतिबिंबें किंवा चित्रें नेत्राचे मागें असलेल्या पडद्या ( Retina ) वर पडतात आणि ती प्रतिबिंबें किंवा चित्रें जेव्हां शरीरांतील पुरुष किंवा जीव पहातो तेव्हां, ज्याची प्रतिबिंबें किंवा चित्रें त्या पडद्यावर पडलेली आहेत त्या पदार्थाचें किंवा वस्तुंचे ज्ञान त्या पुरुषाला होतें. उदाहरणार्थ समजा, आम्ही प्रत्यक्ष बाबांचें दर्शन घेतलें. बाबा आमचे समोर आहेत तेव्हां बाबाचें हुबेहुब प्रतिबिंबें किंवा चित्र आमच्या नेत्र पटलावर पडते आणि ते जेव्हां आम्ही पहातों, तेव्हां बाबांचे आम्हांला ज्ञान होतें. तसेंच बाबांची हुबेहुब छबी किंवा तसबीर आमच्यापुढें ठेविली तर तसेंच प्रतिबिंब किंवा चित्र आमच्या नेत्र पटलावर पडणार आणि आम्ही ते लक्षपूर्वक एकाग्र भावनेनें पाहिलें तर प्रत्यक्ष बाबा किंवा त्यांची छबी या दोन्ही वस्तुंचा परिणाम आमच्या मेंदूवर व मनावर सारखाच होणार. पण समजा कीं, प्रत्यक्ष बाबा आमचे समोर असुन त्यांचे प्रतिबिंब आमचे नेत्रपटलावर पडलेले आहे, पण आमचे लक्ष किंवा ध्यान तिकडे नसून तें दुसरीकडे कोठेंतरी लागलेलें आहे तर त्याचा परिणाम काय होईल ? नेत्रपटलावर प्रतिबिंब पडूनहि त्याचे ज्ञान आम्हास होणार नाहीं. म्हणजे बाबा आमचे समोर असून नसून सारखेच. पण याचे उलट आम्ही मोठ्या उत्सुकतेनें आणि भावनेनें, प्रेमानें दुसरीकडे लक्ष न देतां बाबांकडे किंवा त्यांच्या छबीकडे एकसारखे टक लावून पहात आहोंत तर बाबांचे ज्ञान आम्हांस झालेंच पाहिजे. तेव्हां मुख्य गोष्ट आहे ती आमच्या भावनेच्या तीव्रतेची. ती जितकी तीव्र, एकाग्र व दृढ होत जाईल, त्यामानानें बाबांच्या प्रत्यक्ष दर्शनानें अगर त्यांच्या छबीच्या दर्शनानें किंवा त्यांच्या स्मरणानें-ध्यानानें बाबांचें चित्र आमच्या नेत्रपटलावर पडून तें नंतर मन-हृत्पटलावरहि दृढ होत जाईल या करितां आतां बाबा शरीरानें हयात नसले तरी त्यांच्या छबीच्या दर्शनानें, त्यांच्या

निजस्वरूपाच्या एकाग्र ध्यानानें आतां सुद्धा बाबांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा अनुभव घेता येईल. वर दिलेली नं. २ ची बाळाबुवा महाराजांची गोष्ट पहा. त्यांच्या प्रथम प्रत्यक्ष शिरडीतील भेटीच्या वेळी बाबांनी मला सांगितलें की, चार वर्षांपूर्वी यांची मला ओळख आहे. प्रथम हें कोडे बाळाबुवांना उलगडेना. विचाराअंती त्यांना उमजले की चार वर्षांपूर्वी आपण एकदा बाबांच्या छबीला नमन केलें होते. म्हणजे बाबांचे चित्र त्यांचे मनपटलावर हृत्पटलावर पडलेले होते. तें त्यांना आठवून बाबांचे मोठे कौतुक वाटले. आतां त्यांच्या हृत्पटलावर ४ वर्षांपूर्वी पडलेले चित्र बाबांनी जाणले आणि त्यांना जाणविलें ही एकच गोष्ट बाबांच्या सर्वसाक्षी सर्व दर्शी प्रभुत्वाची द्योतक आहे यांत शंका नाहीं.

श्रीसांईनाथार्पणमस्तु—

# श्रीसाईबाबा



## फोटॉचे दर

| | | | |
|---|---|---|---|
| (१) पोस्ट कार्डस | किंमत ८४ | (५) एनलार्जमेंटस् | किं. रु. |
| (२) कार्डसाईज माउंटेड | ,, ८८ | १२×१० | ,, ३ |
| (३) कॅबिनेट साईज माउंटेड | ,, ८१२ | १५×१२ | ,, ४ |
| (४) फुलसाईज माउंटेड | ,, १। | १७×२३ | ,, ५ |

एडिटर श्रीसाईलीला.
गोखले रोड (नॉर्थ) दादर मुंबई.
यांजकडे मिळतील.

## श्री सद्गुरु साईबाबा.



# पुण्यतिथि

कृ. सा. न. वि. वि. आधुनिक संतचूडामणि सच्चिदानंद **श्रीसद्गुरु साईबाबा महाराज** संस्थान शि.. ता. कोपरगांव जि. अहमदनगर यांची २३ वी पुण्यतिथि येत्या आश्विन शु॥ १० शके १८६३ मंगळवार ( ता. ३०-९-४१ ) रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बालगोपाळांसह व मित्रमंडळींसह श्रींच्या तीर्थप्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंति आहे.

**श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी मार्फत,**

आपला नम्र साई सेवक,

**श्री. ना. खारकर**

ऑ. चिटणीस,

**श्री साईबाबा शि. सं. क.**

ता. ११ सप्टेंबर १९४१

३७ चराई रोड, ठाणें.

---

( ता. क. भक्तांनी शिरडीस येतांना आपले बरोबर पाणी पिण्यास भांडे, व हल्लीं शिरडी येथें माशा व डांस फार असल्यामुळें, पंखा व मच्छरदाणी जरूर आणणें म्हणजे शिरडीतील वास्तव्य सुखावह होईल. )

## —* कार्यक्रम *—

### आश्विन शु॥ ९ शके १८६३ सोमवार
### ता. २९-९-४१ प्रारंभदिन

नियमित कार्यक्रमा व्यतिरिक्त दोन प्रहरीं कीर्तन.

### आश्विन शु॥ १० मंगळवार ता. ३०-९-४१ (विजयादशमी)

### पुण्यातिथिदिन

रहाटे श्रींच्या समाधीवर रुद्र व पवमान अभिषेक.
सकाळी भिक्षा, नंतर समाधीस मंगल स्नान, पूजा, वस्त्रपरिधान वगैरे;
नंतर पुण्यातिथि कीर्तन.
दुपारी पुण्यतिथि-आराधनाविधि.
सायंकाळी सीमोल्लंघन, रात्री रथाची मिरवणूक.

### आश्विन शु॥ ११ बुधवार ता. १-१०-४१

नियमित कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी कीर्तन.
रात्री पालखीची मिरवणूक.

### आश्विन शु॥ १२ गुरुवार ता. २-१०-४१

नियमित कार्यक्रमा व्यतिरिक्त सकाळी कालाकीर्तन.
दुपारी भोजन समारंभ

सूचना:— वरील कार्यक्रमामध्यें जरूरीप्रमाणें फेरफार केला जाईल.
बाहेरगावचे पाहुणे मंडळींची उत्सवाचे दिवसांत सर्व व्यवस्था नेहमीप्रमाणें राहील.
वर्गण्या, देणग्या वगैरे संस्थानचे सेक्रेटरी, ट्रेझरर व जॉ. ट्रेझरर यांजकडे देऊन पावत्या घ्याव्यात:—

आर. व्ही. वैसास
ट्रेझरर:— गोखले रोड, (नॉर्थ) दादर, मुं. १४

डी. व्ही. सांबारे.
जॉ. ट्रेझरर:—वर्तक वाडी, तेजपाल रोड, विलेपार्ले मुं. २४

Shri Sai Baba



# Announcement

The 23rd Anniversary ( Punya Tithi ) Utsava of the Shake Year 1863 of Shri Sadguru Sai Baba will be celebrated, at His Shrine at Shirdi, Taluka Kopargaon, District Ahmednagar. All Sai Bhaktas are invited to attend and partake in the celebrations which will commence from Monday the 29th September 1941 and terminate on Thursday the 2nd October 1941.

Contributions, gifts etc. should be made through The Hon. Secretary, Treasurer and Joint Treasurer who will issue Sansthan receipts,

11th September 1941.
37 Charai Road
Thana

S. N. Kharkar.
*Hon. Secretary*

Shri Sai Baba Shirdi Sansthan Committee

R. V. Ghaisas. Treasurer
Gokhale Road, North Dadar, Bombay 14.

D. V. Sambare. Joint Treasurer
Vartak Wadi, Tajpal Road, Vileparle. Bombay 24.

## श्री साईबाबा

श्री. साईबाबा शिरडी संस्थानच्या भक्त मंडळाची २० वी वार्षिक सभा शिरडी येथें दिक्षीत वाड्यांत मंगळवार ता. ८-७-४१ रोजी दुपारी ३-३० वाजतां भरली होती त्या सभेचें टिपण:—

### हजर सभासद

१ रा. रा. गो. का. गाडगीळ (बॅरिस्टर). २. सौ. लक्ष्मीबाई गोविंदराव गाडगीळ.
३ श्रीमंत् पूर्णचन्द्र गोपाळराव बुटी. ४ रा. रा. मोरेश्वर कृष्णाजी देसाई.
५ रा. रा. विनायक आप्पाजी वैद्य. ६ रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे.
७ रा. सा. यशवंत ज. गाळवणकर. ८ रा. रा रा. बा. चैसास.
९ रा. रा. वसंतराव ना. गोरक्षकर. १० रा. रा. श्री. ना. खारकर.
११ रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान. १२ रा. रा. ता. ग. पाटील कोते.

रा. रा. वि. आ. वैद्य यांचे सुचनेस रा. रा. गो. कृ. देसाई यांनी अनुमोदन दिल्यावरून सर्वानुमतें रा. ब. मो. वि. प्रधान यांची अध्यक्षांचे जागीं निवडणूक होऊन त्यांनीं अध्यक्षपद स्वीकारल्यावर सभेच्या कामास सुरवात झाली.

ठराव नं. १–गेल्या ता. ४-५-४१ च्या भ. मंडळाच्या १९ व्या वार्षिक सभेचें टिपण वाचून सर्वानुमतें मंजूर करणेचें ठरलें व त्यावर अध्यक्षांची सही झाली.

ठराव नं. २–रा. रा. गो. का. गाडगीळ यांचे सुचनेस रा. रा. व ना. गोरक्षकर यांनीं अनुमोदन दिलेवरून सर्वानुमतें अध्यक्षांचे आभार मानणेचें मंजूर होऊन सभेचें काम संपलें.

नंतर अध्यक्षांनीं सभा बरखास्त झाली असल्याचें जाहीर करण्याचे अगोदर खासगी रितीनें सभेस खुलासा केला कीं, संस्थान चिटणीस व श्रीमंत केशवराव भय्यासाहेब बुटी यांचे दरम्यान पत्रव्यवहार होऊन श्रीमंत केशवराव भयासाहेब बुटी यांनीं कळविले प्रमाणें उभय पक्षीं सलोख्यानें या गुरु पौर्णिमेपासून उत्सव व्यवस्था संस्थान कमिटीकडे आली आहे.

शिरडी, ता. ८–७–४१

श्री. ना. खारकर.

ऑ. चि. शि. सं. क.

# श्रीसाईनाथ

—०—

चिंचणकर ट्रस्टच्या उत्पन्नांतून शिरडी संस्थानास येणाऱ्या तीनचतुर्थांश हिस्साचा हिशोब त्या ट्रस्टच्या विश्वस्तांकडून शके १८६० ते १८६२ या त्रैवार्षिकाच्या हिशोबाचे उतारे शिरडी संस्थानास सादर करण्यांत आले आहेत. त्यावरून ते पुढीलप्रमाणें आहेत. यापूर्वीच्या त्रैवार्षिकाचा हिशोब लीला अंक ९–१० वर्ष १४, पान आठवर आलेला आहे.

| शके | उत्पन्न | खर्च | शिल्लक | ३/४ हिस्सा | १/४ हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १८६० | ११७१-०-० | १४८-१४-३ | १०२२-१-९ | ७६६-९-० | २५५-८-९ |
| १८६१ | ८९५-०-० | १५७-१३-० | ७३७-३-० | ५५२-१४-० | १८४-५-० |
| १८६२ | १०७०-०-० | १४७-६-६ | ९२२-९-६ | ६९२-०-० | २३०-९-६ |
| | ३१३६-०-० | ४५४-१-९ | २६८१-१४-३ | २०११-७-० | ६७०-७-३ |

शके १८६० सालांत नवलकरवाडा खरेदीसाठी रक्कम रु. १४५० चिंचणकर ट्रस्टकडून शि. संस्थानास आगाऊ आलेली होती. त्यावेळीं त्या ट्रस्टकडून शि. संस्थानास तीनचतुर्थांशचे येणें पोटी फक्त रु. १४--०--२ फिरत होते म्हणजे त्या ट्रस्टकडुन पुढील देण्यापोटीं आगाऊ पोच रक्कम रु. १४३५--१५–९ ची झाली होती. ही रक्कम शके १८६२ अखेर तीनचतुर्थांश हिश्याच्या येणाऱ्या रक्कम रु. २०११–७–० या रकमेंतून वजा देतां नक्की येणें निघणारी रक्कम रु. ५७५--७-३ ही होय.

ही रक्कम शिरडी संस्थानास चिंचणकर ट्रस्टकडुन भरणा आली आहे.

३७ पाई रोड,
ठाणे
१६ सप्टेंबर १९४१

श्री. ना. खारकर
ऑ. चि. शि. सं. क.

श्री साईनाथ

# श्री गुरुपौर्णिमा उत्सवाचा अहवाल.

## शके १८६३

श्रीमन्त केशवराव भय्यासाहेब बुटी व श्री. साईबाबा शिर्डी संस्थान कमेटी यांचे विचारानें चालू सालापासून श्री गुरुपौर्णिमेचा उत्सव संस्थान कडून करावा असें ठरल्या मुळें रा. ब. मो. वि. प्रधान, श्री वसन्तराव गोरक्षकर, श्री नानासाहेब खासकर, श्री रामभाऊ घैसास, श्री. र. भा. पुरंदरे, रावसाहेब यशवंतराव गाळवणकर, वगैरे संस्थान चालक मंडळी उत्सवाचे तयारीने शिर्डीस आगोदर येऊन दाखल झाली होती. यंदा उत्सवाचे अगोदर अतिशय पाऊस झाला, त्यामुळें रेल्वेच्या वगैरे वाहतुकी बंद होत्या. कांहीं भक्तांना तर गोदावरी, प्रवरा, मुळा वगैरे नद्यांना महापुर आल्यानें मध्येंच अडकून राहावें लागलें. एकंदरींत भक्तांना प्रवासाची बरीच दगदग व अडचण पडली. कांहीं भक्तांना चितळी, बेलापुर, अशा वाकड्या मार्गानें यावें लागलें. तथापि मुंबई, ठाणें, भोर, नागपूर, धुळें, नगर, मद्रास, पुणें वगैरे ठिकाणाहून बरीच भक्तमंडळी उत्सवास आली होती. [ श्री साईदास मंडळ, पुणें. ] सुमारें पंचवीस मंडळी पुण्याहून दरसाल प्रमाणें स्पेशल मोटारनें शिर्डीस येण्यास निघाली पण वाटेंत नदीचे पुरामुळें राहुरी गावांजवळ अडकून पडली. ही मंडळी उत्सवाचे दुसरे दिवशी नदीचें पाणी उतरल्या नंतर शिर्डीस आली. उत्सवास तारीख ७-७-४१ सोमवार रोजीं प्रारंभ झाला. या दिवशीं नैमित्तिक कार्यक्रमा व्यतिरिक्त श्रींस पंचामृत स्नान, पाहुणे मंडळींस भोजन व रात्रौ रथाची मिरवणूक झाली. मंगळवार ता. ८-७-४१ पहाटे. काकड आरती नंतर श्रींचे समाधीवर भक्तांचे लघुरुद्र, अभिषेक, विष्णुसहस्र-तुलसी आर्चन, पंचामृतस्नान, वस्त्र, फल, पुष्प, नैवेद्यार्पण, आरती, आटक स्तोत्रे, प्रदक्षिणा वगैरे उपासना झाल्या. नंतर बुंदीचे प्रसाद भोजन झाले. दुपारी ४ ते ६ पर्यंत संस्थान गवई यांचे किर्तन झालें, रात्रौ पालखीची मिरवणूक झाली. ता. ९-७-४१ रोजीं संस्थानचे सन्मानीय ट्रस्टी रावसाहेब यशवंतराव गाळवणकर यांचे १० ते १२॥ पर्यन्त फारच सुश्राव्य असे कालाकिर्तन झालें व नंतर भोजन समारंभ झाला. सायंकाळीं श्रीसाईदास मंडळ पुणें यांनी श्रीद्वारकामाईत तासभर भजनाची हजेरी दिली.

उत्सवांत एकंदर हजार बाराशें भोजनपात्र व दोनतीनशें गोरगरिबास कोरडे शिधे इतकें अन्नसंतर्पण झालें व गोरगरिब, सेवेकरी व नोकरवर्ग व इतर स्थानिक वर्ग, ज्यांनीं उत्सव कार्यात अंगमेहनत केली त्यांस आर्थिक मदत देण्यात आली.

असो. अशी ही उत्सवरुपी सेवा श्रीसाईबाबा भक्तांचे कडून दरसाल करवून घेऊन जे कोणी त्या कार्यास हस्तें परहस्तें मदत करीत जातील त्यांचें अभीष्ट निरंतर राखोत हीच श्रीच्या चरणीं प्रार्थना आहे.

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमेटी मार्फत

श्री साई-सेवक

श्री. ना खारकर

ऑ. चि. शि. सं. क.

## श्री गुरुपौर्णिमा उत्सव.

## शके १८६३ चा

### जमा खर्चाचा आढावा

उत्सवाचे जमाखर्चाच्या ऑगस्ट आखेरच्या खालीं दिलेल्या आंकड्यांवरून खर्चाची पुर्तता वसुलींतून झाल्यासारखी आहे. नक्की आंकडे वार्षिक जमा खर्चाचे आढाव्यांत येतीलच.

| जमा. | | खर्च. | |
|---|---|---|---|
| १९–१३–६ | पेट्या वसुली | ५४–६–० | श्री. बुटी मार्फत रेल्वे भाडें वगैरे |
| १०१—०–० | श्रीमंत बुटीमार्फत | ३५८–१५–३ | बाळा गुरव मार्फत सामान खरेदी मजुरी वगैरे. |
| ४४९—५–० | चिटणीस ,, | १४६–९–६ | खजिनदारमार्फत निमंत्रण पोस्टेज छपाई इत्यादि व सामान वगैरे. |
| ४३–१०–३ | खजिनदार ,, | ३२–५–३ | चिटणीस मार्फत सामान ध. कृ. वगैरे. |
| १—०—० | बाळा गुरव ,, | ८३–२–६ | बाळा मार्फत प्रसाद खर्च पोस्टेजमुद्दां |
| ४१–१५–९ | सामान विकी वसुली | | |
| ६५६–१२–६ | | | |
| १८–१०–० | तूर्त कमी | | |
| ६७५–६–६ | | ६७५—६–६ | |

# शिरडी वृत्त

## जून १९४१

या महिन्यांत खालील गांवांहून भक्त-मंडळी श्रीसाईबाबांचे दर्शनास येऊन गेली. नागपूर, पुणें, मद्रास, ठाणें, दादर, सांताक्रुझ, हैद्राबाद ( दक्षिण ) अकोला ( वऱ्हाड ), वसई वगैरे.

### देणगी

श्रीसाईमाई यांनीं गंगाजमनी रेशीम काठी उपरणें श्रीस अर्पण केलें.

### धर्मकृत्यें

अभिषेकः—६४ चौसष्ट.

लघुरुद्रः—३ तीन.

विष्णूसहस्र तुलसी अर्चनेः— १३ तेरा.

अन्नदानः— सौ. सोनाबाई सोपानराव शिंदे यांनीं गोडभाताचें अन्नदान गोरगरीबास केलें.

नैवेद्यः—आंबरसाचा— श्री. नानू पुजारी, बाळा गुरव, व विठ्ठलराव गवई,

,, व श्रीमती साईमाई यांनीं पुरणपोळीचा नैवेद्य आर्पण केला.

### कीर्तनें

संस्थान गवई यांचीं ज्येष्ट शु॥ ११ व जेष्ठ व॥ ११ अशी दोन कीर्तनें झालीं.

### नवल विशेष

श्रीच्या चावडीवरील गच्चीचे व श्री. कै. नवलकर वाड्यांतील श्रीनिंबवृक्षपाराचे कामास श्री. नानासाहेब खारकर ऑ. चिटणीस यांचे देखरेखीखाली सुरवात होऊन चावडीच्या गच्चीचें काम पुरें झालें.

हवापाणी उत्तम आहे.

# जुलै १९४१

या महिन्यांत खालील गावांहून भक्त मंडळी श्रीसाईबाबांचे दर्शनास येऊन गेली. नागपूर, सांताक्रुझ, ठाणे, दादर, बांद्रे. पुणे, शिरवळ.(भोर), बेळगांव, अहमदनगर, शिरपूर, जळगांव, (खानदेश), मुंबई, नाशिक, सावंतवाडी वगैरे.

## देणगी तपशील

श्री. हरिसिंग लालसिंग २८ स्टेशन रोड सांताक्रुझ ( मुंबई ) तांबडी जरी काठी शाल अर्पण. श्री. दत्तात्रय अनंत पितळे, अंधेरी, धोतरपान एक ( सुती, साधे, निळी, किनार हातसुति ) अर्पण. श्रीसाईदास मंडळ पुणे. जरीकाठी हिरवा पितांबर अर्पण. श्री. सावळाराम नारायण स्वार बांदे ( सावंतवाडी ), उपरणे, बदामीकाठी पान एक ( सुती ) अर्पण. श्री. तुकाराम रामजी तेली बांदे सावंतवाडी उपरणे बदामी–काठी पान एक अर्पण श्री. वामन सांबाशेट केसरकर बांदे, उपरणे जोडी (सुती) एक अर्पण. श्री. रामचंद्र दशरथ चौथे, पुणे, पागोटे तांबडे (साधे) अर्पण. व आठ हाती धोतरपान एक व चोळखण काठ जांभळा अर्पण. सौ. अनसुयाबाई चौधरी, पुणे, एक जरीचा रुमाल रंग तांबडा, एक चोळीचा खण, दोन हात रुमाल व मोठा आरसा अशा वस्तू अर्पण केल्या. श्री. केरबा रामचंद्र फडताळे, पुणे, एक उपरणें, गंगा जमनी काठाचे [ सुती ] अर्पण. श्री. रामनारायण काशिनाथ सोमाणी, रविवार ३३९, नाशिक, गलेफ, रंग पिवळा, गुलाबी किनार ( गोंट ) अर्पण. श्री. प्रभाकर नारायण ऊर्फ काका नाईक, गोरेगाव. ( मुंबई सबर्बन ) फुलाचे नक्षीकाम केलेला हात रुमाल ११, रंग भगवा [ वायाळ ] अर्पण. श्री. उषाबाई चांदोरकर, अंधेरी, कापड निळे, मधे फुलाची नक्षी असलेले, ४ हात, निळे कापड ( वायाळ ) अर्पण.

## धर्म कृत्यें

जुलै महिन्यांत मद्रासकडील भक्तांची धर्म कृत्यें, नेहमीप्रमाणें बरेच अभिषेक, विष्णु अर्चनें श्रींचे चरणीं झाली

## नवल विशेष

श्रीगुरुपौर्णिमा उत्सव चालू सालापासून श्रीमंत बुटी साहेब व संस्थान कमेटी या उभयतांचे विचारानें संस्थान कडूनच उत्सव करण्यांत आला. आतां यापुढें दरसाल हा उत्सव संस्थानकडूनच साजरा केला जाईल.

(उत्सवाचा अहवाल सविस्तर अलाहिदा छापला आहे.)

संस्थान गवई यांची श्री. गुरुपौर्णिमेचे दिवशीं,

आषाढ शु. ११ चे दिवशीं, श्री नामदेव पुण्यतिथीं,

आषाढ व. ११ चे दिवशी अशी चार कीर्तने झाली.

श्री. रा. सा. यशवंतराव गाळवणकर, वांद्रा, श्रीगुरुपौर्णिमेचे उत्सवांत दोन दिवस ( श्रीएकनाथी भागवत ) पुराण व एक कीर्तन झालें.

श्री. नानासाहेब रासने यांचे श्रीसावता माळी पुण्यतिथीचें कीर्तन झालें, व त्यानी वेळोवेळीं गायन, भजन वगैरे सेवा केली.

श्रींची पालखी व रथाची मिरवणूक उत्सवांत २ दिवस व आषाढी एकादशी चे दिवशीं अशीं निघाली.

यंदा शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे. पाऊस पुष्कळ झाल्यामुळें. श्रीगुरु-पौर्णिमा उत्सवाचे वेळीं पावसामुळें कोपरगांवीं गोदावरीला महापुर आल्यानें भक्तांना येलापुर मार्गानें यावें लागले व त्यामुळें प्रवासाची बरीच दगदग झाली.

## ऑगस्ट १९४१

या महिन्यांत पुणें, मिरज, मुंबई, बंगलोर, दादर, गुटी, (मद्रास), मालाड, इरोड, मद्रास, मदूरा, कानपूर, बेझवाडा, नेलोर आणि अहमदनगर, या गांवाहून भक्तमंडळी श्रीसाईबाबांचे दर्शनास आली होती.

## देणगी

श्री. मुरलीधर यहिनाजी न्हावी खेड, चांदीची छत्री ( ल्हानशी ) दजन-भार ७८ रुपये.

धर्मकृत्यें

या महिन्यांत मद्रासकडील व इतर महाराष्ट्रीय भक्तांचे

अभिषेकः—एकूण २०२ दोनशे दोन.

विष्णुसहस्र तुलसी अर्चनें:—१७.

अन्नदानः- एक शिऱ्याचें, दुसरें खीरीचें, तिसरें लाडवाचें अशी तीन .अन्नदानें झाली.

दर गुरुवारी गोरगरिबांस खिचडी (तांदुळ व तुरीची डाळ) अशी वाटण्यांत येते.

## किर्तने व इतर कार्यक्रम

संस्थान तर्फे यांची श्रीकृष्ण जन्मोत्सव कीर्तन, श्रीकृष्ण काल्याकीर्तन, श्रावण शु. ११ श्रावण व॥ १२, श्री अहिल्याबाई होळकर पुण्यतिथि, श्री गणेश चतुर्थी; व(बापूराव मोरावके यांचे पाहुणे मंडळी करितां ) अशी ७ कीर्तनें झाली.

## नवल विशेष

श्री. केशव लक्ष्मण गाडगीळ यानी श्रींचे मंदिरांत ता. १७।८।४१ रोजी साईपाद् नांवाचा ग्रंथ भाग १ ला याचे पारायण केले. हा ग्रंथ छापून प्रसिद्ध होणार आहे.

शिर्डीचे तलाठी श्री. चंडोपंत कुलकर्णी, यानी श्रींचेमंदिरांत श्रीमद्भागवत सप्ताह मोठ्या थाटानें केला. शेवटचे दिवशी श्रीस नैवेद्य, अभिषेक, ब्राम्हणभोजन वगैरे केले.

श्रीगोकुळअष्टमी उत्सव दरसालप्रमाणें ३ दिवस झाला. शुक्रवार ता. १५-८-४१ रोजीं श्रीचे समाधी मंगलस्नानभंडारा(भोजन),रात्रौ रथाची मिरवणूक. ता. १६-८-४१ रोजीं सकाळीं गोपालकाला होऊन उत्सव समाप्त झाला.

हवा पाणी उत्तम आहे व बाजरीची पीकें बरी आहेत.

ऑ. चिटणीस

शि. सं. क.

———

# श्री साईलीलेंत घेण्यांत येणाऱ्या जाहिरातीचे दर

| | |
|---|---|
| फुलपेज | १० |
| अर्ध पेज | ५ |
| पाव पेज | ३ |
| कव्हर पेज नं. ४ | १२ |

विशेष व कायम जाहिराती करितां समक्ष अगर पत्रव्यवहार करावा.

एडिटर 'साईलीला'.

# अनुभव

मि. जी. के. रेगे पेनशनर तहाशिलदार, इंदर,

सन १९१२ साली आपण आजारी होऊन आपणांस बिलकुल चैन पडत नसे झोपही लागत नसे तेव्हां गिरावला आमचे सासरे नारायणराव परूळकर यांचेकडे गेलों हे गांव हारद्या नजीकचें एक खेडें आहे. आमचे सासरे बाबांचे भक्त होते, त्यांचे जवळ बाबांचे हातची उदी होती. त्यांनीं ती माझे कपाळास लाविली. त्याच दिवशी दुपारचे दोनचे सुमारास मी एका खाटेवर पडलों असतां आपलेसमोर एक संन्यासी उभा आहे व तो माझे खांद्यावर थोपटून मला सांगत आहे कीं, " बाळ भिवूं नकोस तीन दिवसांत बरा होशील, " असें आपण पाहिलें. तेव्हां आपण सासऱ्यांस ओरडून जवळ बोलाविलें व ही हकीकत सांगितली. त्यांना तो संन्यासी काहीं दिसला नाही परंतु त्यांची खात्री होती कीं ते बाबाच असावेत. आश्चर्याची गोष्ट की आपणास खरोखरच बरोबर तिसरे दिवशीं साफ बरें वाटलें. सासऱ्यांनी मला शिरडीस बाबांचे दर्शनास जाणेस सांगितले परंतु दोन वर्षे माझे शिरडीस जाणें घडलें नाहीं. पुढें १९१४ सालीं मी मुलीचे लग्नासाठी रजा घेऊन मांडला येथें गेलों व बाबांचे नांवे कुंकुम पत्रिका पाठविली त्याचे उत्तर आपण लग्नास समक्ष हजर राहूं म्हणून मला मिळालें. लग्नाचे विधींचे ऐन वेळीं शिरडीहून बाबांचे पत्र व सोबत उदी पोष्टमननें माझे हातीं आणून दिली. पत्रांत सोबतची उदी वधुवरांस लावावी म्हणून बाबांची आज्ञा होती. त्याच दिवशी एक फकीर येऊन आमचे सासऱ्यांचे जवळ एक पैसा मागत होता, परंतु त्यांनी त्याचेकडे लक्ष दिलें नाही व नंतर आपण चुकलों व ते बाबाच असावेत म्हणून त्यांस वाईट वाटलेचे त्यांनीं मला कळविलें. तेव्हां मी म्हणालों ते बाबा असले तर त्यांनीं पुन्हां यावें. दुसरे दिवशीं खरोखरच एक फकीर मजकडे येऊन एक पैसा मागूं लागले व मी तो त्यास दिला. आमचे सासरे त्यास जेवण देऊं लागले परंतु त्यांनी ते घेतले नाही. फक्त मजकडून एकच पैसा घेऊन तो निघून गेला

पुढें मुलीचे लग्न उरकलेवर मी शिरडीस बाबांचे दर्शनास गेलों. मला पहातांच बाबा म्हणाले " इतका उशीर को ? " मी म्हटलें मी एक गरीब कारकुनीवर पोट भरणारा असलेमुळें मला इकडे येणेस ऐपत झाली नाही. बाबांनी मग दक्षणा मागितली. मी त्यांस रु. ५ दिले, तेव्हां ते म्हणाले आणखी ५ रु. पाहिजेत. मला कांही उलगडा होईना. मी आणखी पांच दिले. तेव्हां ते म्हणाले आतां तुमकडे कांही येणें राहिलें नाहीं. पुढें घरी आल्यावर बायको म्हणाली आपण एक वर्षांपूर्वी बाबांचे नांवे पांच रुपये मनी आरडरनें पाठविले होते परंतु ती मनीआरडर समक्ष स्वीकार होईल अशा शेऱ्यांनी परत आलेली होती. तेव्हां एकंदर बाबांचे बोलण्याचा उलगडा झाला.

पुढें आमची धाकटी ४ वर्षांची मुलगी प्रेमा ही आजारी झाली. बायको बाबांची फार भक्त असलेमुळें तिचे बाबांचे प्रार्थनेत एक दिवशीं " तिसरें दिवशीं सर्व आजार घेऊन जाईन " म्हणून बाबांचा आदेश तिजला जागृतींत झाला. परंतु तिसरे दिवशीं मुलीनें तिचें मांडीवरच प्राण सोडिला. मला ऑफिसांतून बोलाऊन नेले बायको दुःख करीत होती. मी गेल्येबरोबर सर्व बाजार उलगला असलेचे पाहून गंगोदक तोंडांत घालावे म्हणून गंगोत्रीतील थोडी गंगा व त्यांतच बाबांची उदी टाकून मुलीचे तोंडांत चार थेंब टाकले. टाकलेले थेंब बाहेर आले नाहींत. म्हणून आणखी चार थेंब तोंडांत टाकले तोंच मुलीने डोळे उघडले व माझी खात्री झाली की ती जिवंत आहे. पुढें बाबांचे उदी तिर्थानें ती महिन्याचे आंतच बरी झाली, ती हल्लीं इंदोरचे एल. आर. टी. बोर्डिंग स्कूलमध्यें मेट्रनचे जागेवर आहे.

पुढें १९२६ साली बायको वारली व माझी तबेत ही बरी राहीना, अशा स्थितींत बाबांचे फोटोजवळ एक दिवस विचारांत बसलों असतां " यापुढें नोकरी करूं नकोस " असे शब्द मी स्पष्टपणें ऐकले, पुढें तेच शब्द लागोपाठ तीन दिवस माझे कानी आले. जवळपास दुसरे कोणी नसलेचे पाहून मला आश्चर्य वाटलें, पुढें याचेवर आमचे स्नेही डॉक्टर पारनेरकर यांचें बोलणें होऊन खरोखर हा बाबांचाच मला इशारा आहे असे आमचे ठरून मी त्याच वर्षी १९२६ मध्यें पेनशन घेतले.

याचेपूर्वी १९२४ मध्यें माझी मुलगी मीनाबाई हिचे लग्नाचे काळजींत मी होतो, वराचा कोठें शोध मिळेना, पुढें बायकोस घेऊन तिचे भावाकडे आंजनगावला

गेलो असतां " जिरापूरला जा " असे शब्द मी ऐकल्याचा मला भास झाला. नंतर इंदूरला परत आलों तो मुलाची जिरापूरला नेमणूक झाली असलेचे कळलें, परंतु मुलाची बायको पूर्णमासांची गरोदर असलेमुळें त्याचे वरिष्ठांनी दिलेला हुकूम रद्द केला याच वेळीं माझी स्वतःची रजा संपली व मला कायेगांव येथें नेमले असलेचे समजलें परंतु हुकूमावर सही होणेचे वेळीं मुल्की दिवाणांनी माझे मागणें नसतां माझी नेमणूक जिरापूरला केली, जिरापूरला जाऊन रुजू होऊन पंधरा दिवस झाले नाहीं तोंच मी फिरतीवर सायथ येथें गेलों असतां आमचे भावाकडे मुकामास राहिलों, तेथें त्यांचेकडे एक लायक मुलगा असलेला पहाणेंत आला. चौकशी करितां मुलीस सर्वतोपरी लायक स्थळ असलेचे आढळून आलें. लागलेंच बोलणें होऊन मुलीचे लग्न जमले व त्याप्रमाणें लवकरच कार्यही उरकून माझी काळजी दूर झाली, काय ही बाबांची कृपा व व घटना ? सर्वच अतर्क्य व अगम्य,

( " साई सुधा " जानेवारी १९४१ चे अंकावरून )

## अनुभव

श्री गुलाबभाई जोगीभाई देसाई, मु. रंगून ( ब्रम्हदेश ) हे आपले ता. ११ ऑगस्टचे पत्रांत श्री. खारकर, चिटणीस, शिरडी संस्थान यांस कळवितात कीं, आपले पायावर गाठी होऊन आपण आजलों होतों. डॉक्तरी उपाय चालू होते. मध्यंतरी कांहीं साईभक्तांची गांठ पडून त्यांचे सुचनेवरून बाबांचे उदीचा आणि उपयोग केला व त्यामुळें आज आपणांस फार आराम पडला आहे. या साईबाबांच्या कृपेचे अनुभवामुळें आज आपणाकडे रु. ५ मनीऑर्डरीनें पाठविले आहेत. त्यातून श्रींचे समाधीवर एक लघुरुद्र करावा व त्याप्रमाणें केल्याचें कळवावें.

शिर्डी तारीख २५-६-४१

लेखकः-- डॉ. दत्तात्रय गोपाळ शृंगारपुरे.
वसई जि. ठाणे.

मला एक ब्राह्मण रूपाने ता. २०-५-४१ रोजी सरकारी डॉ. चौबे M. C. P. S. B. Ms. यांचेकडे बाबांची भेट झाली. त्यानंतर डॉ. चौबे हे तुम्ही शिर्डीस जा असें वारंवार बोलू लागले त्यानंतर मलाही तो ध्यास लागला. परंतु कामाच्या अडचणींमुळें नंतर जाऊ असे ठरविले. तारीख १८-६-४१ रोजी पुन्हा मला भास होऊन तुम्ही तारीख २५-६-४१ रोजी शिर्डी मुक्कामी असाल असे वाटू लागले. त्याप्रमाणें बाबांच्या कृपेनें आम्ही तारीख २५-६-४१ रोजी शिर्डी मुक्कामी आलो. त्यांच्या पालखीस, पुजेस, व आरत्यास हजर झालो त्यामुळें मनास फारच आनंद झाला. तसाच तो नेहमी ठेवावा अशी मी श्रीसाईबाबांच्या चरणी मस्तक ठेऊन प्रार्थना करीतो.

आपला बालक
दत्त



श्री

श्री साईबाबा शिरडी संस्थानचा शके १८६१ सा

सालाचे नऊ माहिन्यांचा ता. १-४-४० ते

| जमा | | | |
|---|---|---|---|
| श्री. शिल्लक ता. १-४-३९ रोजी तखंड खजिनदारांचे हाती निघणारी. | ... | | |
| इं. बँक चालू खाती. | ... ... | | |
| ,, ,, सेव्हींग खाती. | ... ... | | |
| पोस्टल ,, ,, | ... ... | | |
| रा. सामंत खजिनदारांचे हाती. | ... ... | | |
| रा. घेसास दु. ख. ,, | ... ... | | |
| रा. खारकर चि. ,, | ... ... | | |
| ,, पुरंदरे दु. चि. ,, | ... ... | | |
| ,, देव विश्वस्त ,, ,, | ... ... | | |
| ,, वाळा गुरव ( शिर्डी ) ,, | ... ... | | |
| इं. बँकेत स्टॉक केलेल्या शिक्यूरिटीज | ... | | A |
| पडलेली किंमत | | | |
| मराठी प्रॉ. फं शेअर्स २ ( वसुली ) | ... ... | | |
| कायम निधी ( भ. मं. वर्गणी सुद्धां ) | ... | | |
| कोठी | ... ... ... | | |
| भक्त धर्मकृत्य | ... ... ... | | |
| रोषनाई | ... ... ... | | |
| लेंडीबाग | ... ... ... | | |
| इंग्रजी वर्ग | ... ... ... | | |
| वाचनालय | ... ... ... | | |
| सामान विक्री ( कपडे वगैरे ) | ... ... | | |
| सभामंडप | ... ... ... | | |
| इमारत फंड ( नवलकरवाडा ) | ... ... | | |
| घरभाडे | ... ... ... | | |
| पेट्या | ... ... ... | | |
| फोटो विक्री | ... ... ... | | |
| पुस्तक विक्री | ... ... ... | | |
| साईलीला वर्गणी | ... ... ... | | |
| व्याज डिव्हीडंट वगैरे | ... ... | | |
| श्री रामनवमी ६१ | ... ... ... | | |
| ,, ,, ६२ | ... ... ... | | |

# श्रीसाई बाबा

श्री साईबाबा शिरडी संस्थानचा शके १८६१ सालचा ( १-४-३९ ते ३१-३-४० ) व शके १८६२ सालचे नऊ महिन्यांचा ता. १-४-४० ते ३१-१२-४० पौष शु॥ २ पर्यंतचा जमेचा तक्ता.

| जमा | १-४-३९ ते ३०-३-३९ | | | १-४-४० ते ३१-३-४० | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री. शिल्लक ता. १-४-३९ रोजी तसेंच खजिनदारांचे हाती शिल्लक. ... | ५०९२ | ० | १० | ० | ० | ० | |
| इं. बँक चालू खाते. ... ... | १५४ | १४ | ८ | १४७८ | १२ | ७ | |
| ,, ,, सेव्हींग खाते. ... ... | २० | ९ | ० | २० | १५ | ० | |
| पोस्टल ,, ,, ... ... | ५ | ० | – | ५ | २ | १ | |
| रा. सामंत खजिनदारांचे हाती. ... ... | ३३४ | १२ | ० | १४३ | ६ | ० | |
| रा. घैसास द. ख. ,, ... ... | ० | ० | ० | २१० | ० | ० | |
| रा. रत्नाकर चि. ,, ... ... | ३५२ | ५ | ३ | ४७७ | १० | ३ | |
| ,, पुरंदरे द. धि. ,, ... ... | ९९ | ८ | ६ | ४४ | १३ | ० | |
| ,, देव विश्वस्त ,, ,, ... ... | ९३ | १ | ० | ७६ | १० | ३ | दर्शनी किंमत |
| ,, बाळा गुरव ( शिर्डी ) ,, ... ... | १९४ | १४ | ६ | ५ | ३ | ३ | (A) ५५९०० |
| इं. बँकेत स्टॉक केलेल्या सिक्यूरिटीज पडलेली किंमत ... | A ३९०९९ | १२ | ६ | B ४०९५९ | ३ | १० | (B) ५७१०० |
| मराठी प्रॉ. फं शेअर्स २ ( वसुली ) ... ... | १०० | ० | ० | १०० | ० | ० | |
| कायम निधी ( भ. मं. वर्गणी सुद्धां ) ... | १९१४ | १२ | ० | १४४७ | ० | ३ | |
| कोठी ... ... ... | १२८७ | ४ | ० | १३३९ | ११ | ६ | |
| भक्त धर्मकृत्य ... ... ... | ५९८ | ६ | ९ | १७०७ | १३ | ९ | |
| रोषनाई ... ... ... | ९७ | ४ | ० | ४२ | १३ | ० | |
| लेंडीबाग ... ... ... | ४६ | १० | ६ | ७२ | २ | ३ | |
| इंग्रजी वर्ग ... ... ... | ० | ० | ० | ६२ | ० | ० | |
| वाचनालय ... ... ... | १ | ० | ० | ० | ० | ० | |
| सामान विक्री ( कपडे वगैरे ) ... ... | १२६ | ६ | ३ | ० | ० | ० | |
| सभामंडप ... ... ... | २० | ० | ० | ० | ० | ० | |
| इमारत फंड ( नवल्करवाडा ) ... ... | २९८ | ० | ० | ११०१ | ४ | ० | |
| घरभाडे ... ... ... | ८३ | ४ | ० | ८२ | १२ | ९ | |
| पेट्या : ... ... ... | ७५१ | ५ | ३ | ७९२ | ९ | ६ | |
| फोटो विक्री ... ... ... | ८८ | ० | ० | ३९ | ४ | ० | |
| पुस्तक विक्री ... ... ... | ७२ | ४ | ३ | २९८ | १३ | ४ | |
| साईलीला वर्गणी ... ... ... | ५९२ | ७ | ० | ४६९ | ० | ० | |
| व्याज डिव्हीडंट वगैरे ... ... | ११३५ | १४ | १ | १०६३ | ७ | ० | |
| श्री रामनवमी ६१ ... ... ... | ८५ | ५ | ३ | ० | ० | ० | |
| ,, ,, ६२ ... ... ... | ९९ | ८ | ० | ६३९ | १२ | ० | |
| ,, गुरु पौर्णिमा ... ... ... | ३९६ | २ | ० | ४१३ | २ | ९ | |
| ,, पुण्य तिथि ... ... ... | ९४१ | ८ | ९ | १४०४ | १५ | ३ | |
| ,, गोकुळ अष्टमी ... ... ... | १३ | ० | ० | ४ | ५ | ३ | |
| ,, दत्तजयंती ... ... ... | १ | ० | ० | ६ | १ | ३ | |
| इतर किरकोळ ... ... ... | ९ | २ | ० | ३ | १४ | ० | |
| एकूण | ५५६२३ | १४ | ४ | ५५२८२ | ० | १ | |

Examined and found correct–Bank
Balance from the pass books & safe custody ...

श्रीसाई बाबा

श्री साईबाबा शिरडी संस्थानचा शके १८६१ साल्चा ( १-४-३९ ते ३१-३-४० ) व शके १८६२ सालचे नऊ महिन्यांचा ता. १-४-४० ते ३१-१२-४० पौष शुां ३ पर्यंतचा खर्चाचा तक्ता.

| खर्च | १ ४/३९ ते ३१ ३/४० | | | १ ४/४० ते ३१ १२/४० | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुजा नैवेद्य ... ... ... | ३५८ | १५ | ३ | ३३४ | १ | ६ | |
| दक्षणा ... ... ... | ३५६ | ० | ० | २६२ | ० | ० | |
| धर्मकृत्य ( धर्मादायसुद्धां ) ... ... | २२८ | ९ | ० | ७६५ | ५ | ० | |
| धूनी ... ... ... | ५० | १४ | ० | ६७ | ० | ० | |
| रोपनाई ... ... ... | १६० | १३ | ० | २६२ | ७ | ० | |
| कोठी ... ... ... | ६७ | ४ | ६ | २७ | ० | ० | |
| पगार ... ... ... | १२०३ | ८ | ० | १०२९ | ८ | ० | |
| लेंडिबाग ... ... ... | २८४ | १४ | ३ | १६५ | १ | ३ | |
| वाचनालय ... ... ... | १४ | ९ | ० | ६५ | ० | ० | |
| फोटो खरेदी ... ... ... | ८२ | २ | ० | २८ | १३ | ६ | |
| कोर्ट खर्च ... ... ... | ५५ | ६ | ० | ३५ | ० | ० | |
| ऑफिस खर्च ... ... ... | ११९९ | ९ | ० | ४६३ | ८ | ० | |
| टपाल खर्च ... ... ... | १६६ | ६ | ९ | १० | १२ | ३ | |
| साईलीला ... ... ... | ११४१ | ० | ० | १२१५ | २ | ३ | |
| पुस्तके छपाई ... ... | १५० | १ | ० | २०२ | १५ | ० | |
| फर्नीचर ( कपाट स्टूल वगैरे ) ... ... | ६६ | ४ | ० | | | | |
| भांडी खरेदी चांदीचे गडवटके व छत्रीसुद्धां ... ... | २०५ | ३ | ६ | १८२ | ८ | ६ | |
| किरकोळ दुरुस्ती ... ... ... | ३ | ११ | ० | ३५ | १२ | ३ | |
| इंग्रजी वर्ग ... ... ... | ० | ० | ० | ६९ | ८ | ० | |
| किरकोळ खर्च ... ... ... | २०३ | ८ | ९ | १७३ | १३ | ९ | |
| श्री रामनवमी ( ६१ ) ... ... | १४८ | ८ | ६ | | | | |
| ,, ,, ( ६२ ) ... ... | ६० | ० | ० | ५८४ | ६ | ० | |
| ,, गुरुपौर्णिमा ... ... | ४२० | २ | ० | ४६५ | ० | ३ | |
| ,, पुण्यतिथी ... ... ... | ८०८ | ११ | ९ | ८५४ | १५ | ६ | |
| ,, गोकुळ आष्टमी ... ... .. | ३८ | ० | ० | ३० | ५ | ३ | |
| ,, दत्तजयंती ... ... ... | १ | ० | ० | ४ | ८ | ० | |
| ,, कै. तर्खड खजिनदार खाती बुडीत डि. ज. अहमदनगरचे कोर्टातील कि. अर्ज नं. १ सन १९३९ निकाल ता. ५-६-३९ प्रमाणें ... ... | ५०९२ | ० | १० | | | | |
| ई. बँक चालू खाती ... ... | १४७८ | १२ | ७ | ८८५ | १० | १ | |
| ,, सेव्हींग " ... ... ... | २० | १५ | ० | ३६३३ | १५ | ० | |
| पोस्टल ,, ... ... ... | ५ | २ | १ | १०७० | २ | १ | |
| रा. सामंत खजिनदार हाती ... ... | १४३ | ६ | ० | ० | | ० | |
| ,, घैसास दु. ,, ... ... ... | २१० | ० | ० | २७४ | ४ | ३ | |
| ,, खारकर चि. ... ... ... | ४७७ | १० | ३ | ५४२ | ३ | ६ | |
| ,, पुरंदरे दु. चि॰ ... ... | ४४ | १३ | ० | ६० | ६ | ९ | |
| देव विश्वस्त ... ... ... | ७६ | १० | ३ | १५ | ७ | ६ | दर्शनी किंमत |
| ,, थाव्य गुरव ( शिर्डी ) ... ... | ५ | ३ | ३ | २१८ | ० | ३ | A ५५, ९०० |
| मार्गात सिक्युरिटीज स्टॉक केलेल्या पडलेली किंमत ... ... | A ३९७९९ | १२ | ६ | B ४०९४९ | ३ | १० | B ५७, ९०० |
| चालू साली सिक्युरिटीज खरेदी केल्यावर पडलेली किंमत ... ... | A ११५९ | ७ | ४ | B ८७ | ८ | ७ | दर्शनी किंमत A १२०० |

, सालचा ( १-४-३९ ते ३१-३-४० ) व शके १८६२ ते ३१-१२-४० पौष शुा। ३ पर्यंतचा खर्चाचा तक्ता.

| १ ४/३९ ते ३१ ३/४० | | | | १ ४/४० ते ३१ १२/४० | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३९८ | १५ | ३ | | ३३४ | १ | ६ | |
| ३५६ | ० | ० | | २६२ | ० | ० | |
| २२८ | ९ | ० | | ७६५ | ५ | ० | |
| ५० | १४ | ० | | ६७ | ० | ० | |
| ६० | १३ | ० | | २६२ | ० | ० | |
| ६७ | ४ | ६ | | २७ | ० | ० | |
| १२०३ | ८ | ० | | १०२९ | ८ | ० | |
| २८४ | १४ | ३ | | १६५ | १ | ३ | |
| १४ | ९ | ० | | ६५ | ० | ० | |
| ८२ | २ | ० | | ३८ | १३ | ६ | |
| ५५ | ६ | ० | | २५ | ० | ० | |
| २९१ | ९ | ० | | ४६३ | ८ | ० | |
| १६९ | ६ | ९ | | ९० | १२ | ३ | |
| ११४१ | ० | ० | | १३१५ | २ | ३ | |
| १५० | १ | ० | | २०२ | १५ | ० | |
| ६३ | ४ | ० | | | | | |
| २०५ | ३ | ६ | | १८२ | ८ | ६ | |
| | | | | | | | |
| ३ | ११ | ० | | ३५ | १२ | ३ | |
| ० | ८ | ० | | ६१ | ८ | ० | |
| २०३ | ८ | ९ | | १७३ | १३ | ९ | |
| १४८ | ८ | ६ | | | | | |
| ६० | ० | ० | | ५८४ | ६ | ० | |
| ४२० | २ | ० | | ४६५ | ० | ३ | |
| ४०८ | ११ | ९ | | ८५४ | १५ | ६ | |
| ३८ | ० | ० | | ३० | ५ | ३ | |
| १ | ० | ० | | ४ | ८ | ० | |
| ५०९२ | ० | १० | | | | | |

# श्रीसाईबाबा, शिरडी संस्थानांत विक्रीकरितां पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| (१) | सच्चरित | किं. रु. ३॥ |
| (२) | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजरी | |
| (३) | ,, (अध्याय ४) | |
| (४) | सगुणोपासना | ८= |
| (५) | प्रधान पुस्तक (इंग्रजी) | १ |
| (६) | शिरडी गाईड (,,) | ८= |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय फोटो निरनिराळ्या साईजचे वगैरे करितां खालील पत्त्यावर लिहून खुलासा घ्यावा:—

(१) कारकून, शि. संस्थान, मु. शिरडी व पोस्ट राहते जि. अहमदनगर

(२) एडिटर, साईलीला, गोखले रोड (नॉर्थ)
दादर-मुंबई १४.

(3) R. Vanchinathan, 30 N. V. Chettys Street Triplicane, Madras (for the coloured Pictures)

(४) सौ. इंदिराबाई सुर्वेने बाबांचे रंगित चित्र रा. रा. दा. वि. सांबारे, तेजपाल रोड, वर्तकवाडी, विलेपार्ले. यांचेकडे मिळेल.

---

(१) रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल, हेडमास्तर सोसायटी हायस्कूल, उमरेठ जि. केरा यांचेकडे मिळणारी पुस्तकें:—

(गुजराथी) मनाचे श्लोक, हरिपाठ व गुरुस्मृती.

(२) डॉ. व्ही. रघुनाथ L. M. & S. बांद्रा यांचेकडे

श्री. साईनाथ भजन माला (श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकर कृत) मिळेल.

All correspondence regarding Shri Sai Leela should be addressed to-Editor, Sai Lila, Gokhale Road ( North ) Dadar, Bombay 14

---


छातींचे विकारावर

सांइ ब्रदर्स याचे

# HEARTINA

excellent Heart Tonic

## हार्टिना

छातींत कळा येणें, सुई टोचल्या सारखें वाटणें, छातींत घबराट होणें, फुफ्फुस विकार, High Blood Pressure इत्यादि विकारांवर रामबाण.

Regd.

(HEARTINA)

बा. किं. रु.३ (ट.ख.नि.)

सविस्तर माहितीसाठीं लिहाः—

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर लि.

आर्यौषधि कारखाना.

चेंबूर--मुंबई.


सूचनाः—कोणास जाहिराती देणें असल्यास खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा. रामचंद्र वासुदेव घैसास लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २ गोखले रोड नॉर्थ, दादर.

---


Printed By Mr. D. P. Agashe at Swastik Printers Lady Jamshetji Road Dadar Published by R. V. Ghaisas- Lokamanya Tilak Jubilee Trust Bldg No. 2 Gokhale Road, North. Dadar, Bombay 14.